रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २१३

www.ramprahar.com

मंगळवार, १८ फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

पळसदरी जंगलात जनावरांचे सांगाडे, कातडी आढळली/२

रेवदंडा पुलानजीक बुडालेले बार्ज ठरतेय धोकादायक!/५

आयएसपीएल स्टार रजत मुंढेचे जल्लोषात स्वागत/८

## जीबीएससंदर्भात बैठक घेऊन निर्णय घेणार -ना. जाधव

**नवी दिल्ली :** जीबीएस (गुइलेन बॅरे सिंड्रोम) आजारामुळे राज्यात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. पुण्यात पहिल्यांदा या आजाराचे रुग्ण आढळल्यानंतर आता राज्यभरात जीबीएसच्या रुग्णांची संख्या वाढताना दिसत आहे. राज्यात आतापर्यंत आठ रुग्णांचा मृत्यू झाला असून अनेकजण उपचारांसाठी रुग्णालयात दाखल आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी महत्त्वाचे विधान केले आहे. या संदर्भात केंद्रीय आरोग्य मंत्रालय अतिशय तत्परतेने काम करत आहे. राज्याच्या आरोग्य खात्याने यावर मात करण्यासाठी पूर्ण व्यवस्था केली आहे. जर हा आजार संसर्गजन्य असल्याचे समोर आले तर त्यावर कडक उपाययोजना केल्या जातील. लवकरच अधिकारी आणि प्रशासनाची बैठक घेऊन निर्णय घेणार असल्याचेही ते म्हणाले.

# शिंदेसेनेचे ऑपरेशन टायगर; ठाकरेसेना बॅकफूटवर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याच्या राजकीय वर्तुळात गेल्या काही दिवसांपासून ऑपरेशन टायगरची चर्चा जोरदार चर्चा सुरू आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे काही, आजी-माजी आमदार, खासदार फुटून शिवसेना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत जाणार असल्याचे बोलले जात आहे. काही दिवसांपूर्वी ठाकरेंचे विश्वासू आणि निकटवर्तीय मानले जाणारे माजी आमदार राजन साळवी यांनी शिंदेंच्या सेनेत प्रवेश केला. इतर छोटे-मोठे पदाधिकारीही पक्षप्रवेश करीत आहेत.

'उबाठा'चे पनवेल तालुकाप्रमुख रघुनाथ पाटील यांनी रविवारी मुख्यमंत्री शिंदे आणि मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या उपस्थितीत



शिवसेनेत प्रवेश केला. त्यानंतर सोमवारी ठाकरे यांना आणखी एक मोठा धक्का बसला आहे. त्यांच्या गटाचे नेते जितेंद्र जनावळे यांनी पक्षाचा राजीनामा दिले. जनावळे विलेपार्लेचे उपविभाग प्रमुख आहेत. त्यानंतर ठाकरेसेनेला रत्नागिरीतदेखील खिंडार पडले आहे. रत्नागिरी व दापोली नगरपंचायतीमधील पाच नगरसेवकांनी वेगळा गट स्थापन केला आहे. हे पाचही नगरसेवक शिवसेनेत प्रवेश करणार आहेत.

पुढील काही दिवसांमध्ये राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागू शकतात. या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाला एकापाठोपाठ एक धक्के बसत असल्याचे चित्र आहे. दोनच दिवसांपूर्वी गुहागरचे आमदार भास्कर जाधव यांनी थेट ठाकरेंविषयी नाराजी व्यक्त केली होती. नंतर त्यांनी माघार घेतली असली तरी जे काही बोलायचे ते जाधव बोलून मोकळे झाले आहेत. त्यांनीही वेगळा निर्णय घेतल्यास आश्चर्य वाटायला नको.

दरम्यान, पक्षाला आणखी काही धक्के बसू नयेत यासाठी उद्धव ठाकरे यांनी आता डॅमेज कंट्रोलसाठी प्रयत्न सुरू केले आहेत. पक्षातील माजी आमदार, अनेक पदाधिकारी साथ सोडत असताना ठाकरेंनी यांनी आमदार, खासदारांची बैठक बोलवली आहे. २० तारखेला खासदार आणि २५ तारखेला आमदारांना बैठकीला उपस्थित राहण्याचे शिवसेना भवन येथून आदेश देण्यात आले असल्याचे सूत्रांकडून कळते.

**'उठाबा'चे तालुकाप्रमुख रघुनाथ पाटील शिवसेनेत** **(सविस्तर वृत्त पान ३ वर..)**

## आद्य क्रांतिवीरांना अभिवादन



**पनवेल : आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या १४२व्या पुण्यतिथीनिमित्त शिरढोण येथे राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी विनम्र अभिवादन केले. या वेळी क्रांतिज्योती मित्र मंडळाच्या वतीने आयोजित क्रांतिज्योतीचेही उपस्थितांकडून स्वागत करण्यात आले.**

## नवी मुंबई मनपा कंत्राटी कामगारांचा वेतन प्रश्न लवकरच मार्गी लागणार

■ कामगारमंत्री फुंडकर यांचे आयुक्तांना कार्यवाहीचे निर्देश



**मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिकेतील कंत्राटी कामगारांच्या वेतनाचा प्रश्न लवकरच निकाली काढण्यात येईल. या संदर्भात महापालिका आयुक्तांनी कार्यवाही करून कंत्राटी कामगारांचा प्रश्न लवकर मार्गी लावावा, असे कामगारमंत्री आकाश फुंडकर यांनी सांगितले.

नवी मुंबई महापालिकेतील आठ हजार कंत्राटी सफाई कामगार तसेच ठोक मानधन रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या १००८ कामगारांच्या वेतनाबाबत कामगारमंत्री फुंडकर यांच्या मंत्रालयीन दालनात बैठक आयोजित करण्यात आली. त्या वेळी ते बोलत होते.

या बैठकीस माजी खासदार तथा श्रमिक संघटनेचे अध्यक्ष संजीव नाईक, कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय.ए. कुंदन, नवी मुंबई महापालिका आयुक्त कैलास शिंदे, कामगार विभागाचे अधिकारी, विविध कामगार संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. **(पान २ वर..)**

## पाकच्या स्टेडियममध्ये भारतीय ध्वज नाही

**लाहोर :** भारताविरुद्धच्या कारवाया पाकिस्तान थांबवताना दिसत नाही. बीबीसीआयने चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी टीम इंडियाला पाकिस्तान पाठवले नसून संघाचे सामने हायब्रिड मॉडेलनुसार दुबईत होणार आहेत. या पार्श्वभूमीवर लाहोरचे गद्दाफी स्टेडियम आणि कराचीच्या नॅशनल स्टेडियमवर भारतीय ध्वज दिसला नसल्याने चाहत्यांनी प्रश्न उपस्थित केलाय.

व्हायरल झालेल्या एका व्हिडीओत चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये सहभागी झालेल्या इतर सात देशांचे ध्वज गद्दाफी फडकवण्यात आले, मात्र भारताचा ध्वज गायब होता. त्यामुळे पीसीबीवर टीका होत आहे.

## पनवेलच्या न्हावेखाडीत शिवमंदिर जीर्णोद्धार सोहळा

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते श्रींची पुन:प्रतिष्ठापना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील नावेखाडी मधलापाडा येथे शिवमंदिर जीर्णोद्धार आणि श्रींची पुन:प्रतिष्ठापना सोहळा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि. १७) उत्साहात झाला.

कै. मुक्ताबाई मोकल आणि नागेश मोकल यांच्या स्मरणार्थ सावळाराम मोकल आणि कुसुम मोकल यांनी स्वखर्चातून बांधलेल्या शिवमंदिराचा जीर्णोद्धार सोहळा विविध धार्मिक कार्यक्रम राबवून झाला. यानिमित्ताने दोन दिवस कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते श्रींची पुन:प्रतिष्ठापना झाली.



या सोहळ्याला भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, उद्योजक जे.एम. म्हात्रे, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, साई डेव्हलपर्सचे विजय कडू, न्हावे ग्रामपंचायत सदस्य सागर ठाकूर, सुनिता भोईर, रंजना पाटील, जागृती म्हात्रे, अरुणशेठ ठाकूर, सी.एल ठाकूर, चंद्रकांत भोईर, मंजुषा ठाकूर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. दरम्यान, नरेश मोकल, विलास मोकल, संदीप मोकल यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याला उपस्थित राहिल्याबद्दल आभार मानले.

## निवडक

### महाराष्ट्र सायबर सेल करणार रणवीर अलाहबादियाची चौकशी

**मुंबई :** इंडियाज गॉट लेटेंट कार्यक्रमातील आक्षेपार्ह टिपण्णीबद्दल महाराष्ट्र सायबर सेलने पॉडकास्टर रणवीर अलाहबादिया याला २४ फेब्रुवारी रोजी चौकशीसाठी हजर राहण्यास सांगितले आहे. याच प्रकरणात कॉमेडियन समय रैना याने तो परदेशात असल्याने त्याचा जबाब व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे नोंदवावा, अशी विनंती केली होती, मात्र ती विनंती फेटाळण्यात आली असून त्याला १८ फेब्रुवारी रोजी त्याचे म्हणणे मांडण्यासाठी प्रत्यक्ष हजर राहावेच लागेल, असे सायबर सेलने म्हटलेय.

### मालवणच्या राजकोट किल्ल्यावरील शिवपुतळ्याची बुधवारी पायाभरणी

**मालवण :** येथील राजकोट किल्ल्यावर उभारण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या नव्या पुतळ्याच्या कामाची पायाभरणी शिवजयंती दिनी अर्थात येत्या बुधवारी (दि. १९) करण्यात येणार आहे. पालकमंत्री नितेश राणे यांच्या हस्ते हा सोहळा होणार असून तांत्रिक बाबींची पूर्तता करून लवकरच पुतळ्याच्या उभारणीस सुरुवात करण्यात येईल, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभाग सावंतवाडीचे कार्यकारी अभियंता महेंद्र किणी यांनी पत्रकार परिषदेत दिली. अभियंता अजित पाटील सोबत होते.



## कोळी बांधवांच्या समस्या सोडवू -ॲड. राहुल नार्वेकर

**पाली : प्रतिनिधी**

देशाच्या प्रगतीत मोठे योगदान देणारे मच्छीमार आहेत. येत्या काळात त्यांच्या सर्व समस्या सोडवण्याची भूमिका आम्ही घेणार आहोत. विशेषतः मच्छीमार, कोळी बांधवांच्या कर्जमाफीसाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी मच्छिमारांच्या जाहीर मेळाव्यात दिली.

नॅशनल फिश वर्कर्स फोरम महाराष्ट्र मच्छीमार कृती समिती आयोजित कार्यशाळा व जाहीर मेळावा रविवारी (दि. १६) अलिबागच्या नवगाव कोळीवाडा येथे पार पडला. त्या वेळी ॲड. नार्वेकर बोलत होते.

या मेळाव्यास आमदार महेंद्र दळवी, एनएफएफ अध्यक्ष लिओ कोलासो, जनरल सचिव ओलेनसीओ सीमोन्स, कार्याध्यक्ष रामकृष्ण तांडेल, सरचिटणीस किरण कोळी, चिटणीस उल्हास वाटखरे, मनोहर बैले, भटके विमुक्त समाजाचे ज्येष्ठ नेते राजू साळुंके, अजय सोडेकर, संतोष पाटील, नवेदर नवगाव सरपंच प्रियांती घातकी आदींसह मच्छीमार संघटनेचे पदाधिकारी व कोळी लोक उपस्थित होते.

मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी नवगाव, थळ ग्रामस्थ आणि महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीचे रायगड जिल्हा पदाधिकारी, सभासद आदींनी मेहनत घेतली.

## महेश बालदी आमदार झाल्यानंतर उरण मतदारसंघात विकासाची गंगा

### भाजप नेते अरुणशेठ भगत यांचे प्रतिपादन; रस्ता कामाचे भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून विधानसभा क्षेत्रामध्ये विविध विकासकामे केली जात आहेत. यालाच अनुसरून सोमवारी (दि. १७) ग्रामपंचायत चावणे ते सवणे गावापर्यंत रस्त्याच्या डांबरीकरणाचे भूमिपूजन भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. आमदार महेश बालदी यांच्या निधीमधून आणि पीडब्ल्यूडीच्या माध्यमातून एक कोटी ८३ लाख ६५ हजार ४२६ रुपये खर्चून हा रस्ता करण्यात येणार आहे

उरण विधानसभा मतदारसंघात आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून, तर पनवेल विधानसभा मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासकामे केली जात आहेत. पूर्वी उरण मतदारसंघामध्ये तुरळक कामे व्हायची, पण महेश बालदी आमदार झाल्यानंतर मतदारसंघातील प्रत्येक विभागात कोट्यवधींची कामे केली जात आहेत. मतदारांनी त्यांना दुसऱ्यांदा मतदानातून आशीर्वाद तुम्ही दिला. यामुळेच एवढ्या मोठ्या प्रमाणात विकास निधी विभागात आल्याचे भाजप नेते अरुणशेठ भगत यांनी या वेळी बोलताना सांगितले. **(पान २ वर..)**




# कुस्तीत महाराष्ट्राचा दबदबा -मुख्यमंत्री

## जामनेरमध्ये अमृता पुजारी आणि विजय चौधरीचे वर्चस्व

**जळगाव : प्रतिनिधी**

’जागतिक पटलावर महाराष्ट्राच्या खेळाडूंनी आपली छाप पाडली आहे, ही अभिमानास्पद बाब आहे,’ असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले. त्यांनी ऑलिम्पिक, कॉमनवेल्थ व एशियन गेम्समध्ये भारतीय खेळाडूंच्या कामगिरीचे कौतुक केले. ’मागील काही काळात मॅटवरील कुस्तीला अधिक प्राधान्य मिळाले होते, मात्र आता मातीवरील कुस्तीने दमदार पुनरागमन केले आहे. कुस्तीच्या माध्यमातून भारताला पहिले ऑलिम्पिक पदक मिळवून देणारे खाशाबा जाधव होते. आज विजय चौधरी, सोनाली मंडलिक यांसारखे खेळाडू परदेशी प्रतिस्पर्ध्यांवर मात करत आहेत,’ असे त्यांनी सांगितले.

नमो कुस्ती महाकुंभ-२ अंतर्गत आयोजित देवाभाऊ केसरी आंतरराष्ट्रीय कुस्ती दंगलमध्ये स्पर्धेत या स्पर्धेत भारत, फ्रान्स, मोल्दोवा, उझबेकिस्तान, रोमानिया, एस्टोनिया, इराण, ब्राझील आणि जॉर्जिया या नऊ देशांतील आंतरराष्ट्रीय स्तरावरील कुस्तीपटू सहभागी झाल्याने ती अधिक रोमांचक ठरली. सलग ११ तास चाललेल्या या



कुस्तीदंगल मध्ये आयोजन राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षाताई खडसे, खासदार स्मिताताई वाघ, माझी मंत्री आ. अनिल पाटील, आमदार सर्वश्री सुरेश भोळे ( राजूमामा ), मंगेश चव्हाण, संजय कुटे, चंद्रकांत सोनवणे, चंद्रकांत पाटील, अमोल पाटील, अमोल जावळे, अनुपभैय्या अग्रवाल, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा पोलीस अधिक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांच्यासह कुस्तीगीर संघटनेचे रामदास तडस, जामनेरच्या माजी नगराध्यक्ष साधनाताई महाजन, कुस्तीगीर संघटनेचे पदाधिकारी, विविध देशांतून आलेले कुस्तीपटू आणि ५० हजारपेक्षा अधिक कुस्तीप्रेमींनी उपस्थिती लावली

कुस्तीप्रेमींच्या जनसागरासमोर लाल मातीत झालेल्या संघर्षात भारतीय पैलवानच भारी ठरले. नमो कुस्ती महाकुंभ २ अंतर्गत आयोजित देवाभाऊ केसरी आंतरराष्ट्रीय कुस्ती दंगलमध्ये महिला महाराष्ट्र केसरी अमृता पुजारी आणि ट्रिपल महाराष्ट्र केसरी विजय चौधरीसह सर्वच भारतीय पैलवानांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील परदेशी पैलवानांना धूळ चारत आपले वर्चस्व दाखवून दिले.

आपल्या तालुक्यात कुस्तीच्या मैदानात लढण्यासाठी आंतरराष्ट्रीय पैलवान येणार असल्यामुळे आज पन्नास हजारांपेक्षा अधिक कुस्तीप्रेमींचा जनसागर पसरला होता. महाराष्ट्र केसरी विजेत्या अमृता पुजारीने रोमानियाच्या ऑलिम्पियन कॅटालिना क्सेन्टने हिच्यावर वर्चस्व गाजवत विजय नोंदविला. शेवटच्या कुस्तीमध्ये अमृताने उत्कृष्ट डावपेच आणि चपळाईने गुण मिळवत आपला पराक्रम सिद्ध केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते विश्वविजेता व ट्रिपल महाराष्ट्र केसरी विजय चौधरीला सन्मानित करण्यात आले. तसेच सर्व विजेत्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदा मंत्री गिरीष महाजन यांच्या हस्ते मानाची गदा देऊन गौरविण्यात आले.

**मुख्यमंत्र्यांकडून मंत्री महाजन यांचे कौतुक**

गिरीश महाजन यांनी विद्यापीठ स्तरावर कुस्तीमध्ये चांगली कामगिरी केली होती. आज राजकारणातही त्यांनी प्रतिस्पर्ध्यांना चित केले आहे!’ असे मिश्कील टिप्पणी करत गिरीश महाजन यांच्या प्रयत्नांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी कौतुक केले.

# शिवजयंतीनिमित्त जय शिवाजी, जय भारत पदयात्रेचे आयोजन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

शिवजयंतीनिमित्ताने १९ फेब्रुवारीला शहरात ’जय शिवाजी जय भारत’ पदयात्रेचे आयोजन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. या कार्यक्रमास सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे. या दिनाचे औचित्य साधून पंतप्रधान नरेंद्र मोदी दूरदृष्यप्रणालीद्वारे देशास संबोधित करणार आहेत असे त्यांनी या वेळी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात त्यासंदर्भात आयोजित बैठकीत ते बोलत होते. या वेळी निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) रवींद्र शेळके, जिल्हा क्रीडा अधिकारी राजेंद्र अतनूर,



जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनावणे यांसह पोलीस विभाग, पनवेल महानगरपालिका तसेच विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

१९ फेब्रुवारीला स.८वा. शिवचरित्रावर व्याख्यान होणार आहे. स.८.३० वा पदयात्रेस प्रारंभ होणार आहे. या पदयात्रेदरम्यान पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच आरोग्यासाठी ॲम्ब्युलन्सची सुविधा करण्यात यावी. पोलीस विभागाने वाहतूक व्यवस्था चोख ठेवावी, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यां दिले.

या कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभूषा असलेली पाच मुले व भारत मातेची वेशभूषा असलेल्या पाच मुली आणि त्यांच्याकरिता लागणारे घोडे याचे नियोजन करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. जास्तीत जास्त नागरिकांनी my bharat पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी जावळे यांनी केले आहे.

# पनवेलमध्ये शिवजयंतीनिमित्त मिरवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल नगरीमध्ये लोकसहभागातुन बुधवारी (दि.१९) छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात येणार आहे.

यानिमित्त श्री. छत्रपती शिवाजी महाराज अश्वारुढ पुतळ्याजवळ कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७ वाजता होणार आहे. सकाळी ७.३० वाजता अश्वारुढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून त्यानंतर ठिक ८ वाजता मिरवणुकीला सुरुवात होणार आहे. श्री. छत्रपती शिवाजी महाराज अर्धाकृती पुतळा टपाल नाका येथे त्याचा समारोप होणार आहे. या मिरवणुकीस सर्व नागरिकांनी उत्स्फुर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन पनवेल महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

# भारतीय डाक ग्रामीण सेवकपदासाठी ३ मार्चपर्यंत ऑनलाईन अर्ज करा

**नवी मुंबई : बातमीदार**

अधीक्षक डाकघर नवी मुंबई विभागाच्या कार्यक्षेत्रातील २१ रिक्त पदे भरण्यात येणार असून, इच्छुक उमेदवारांनी https://indiapostgdsonline.gov.in या संकेतस्थळावरुन ३ मार्च, २०२५ पर्यंत किंवा त्यापूर्वी ऑनलाईन अर्ज भरावेत. असे वरिष्ठ अधीक्षक डाकघर, नवी मुंबई यांनी कळविले आहे.

भारतीय डाक विभागाने ग्रामीण डाक सेवक पदासाठी जाहिरात प्रसिध्द केली आहे. या जाहिरातीनुसार अधीक्षक डाकघर नवी मुंबई विभागाच्या कार्यक्षेत्रातील २१ रिक्त पदे भरण्यात येणार आहेत. यासाठी कोणत्याही माध्यमाद्वारे आलेले अर्ज व व्यक्तिशः आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. विहित पध्दतीने प्राप्त झालेल्या अर्जांचाच विचार केला जाणार आहे. तसेच अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या सूचनांनुसार अर्जदाराला शुल्क भरावे लागेल.

पोस्ट विभाग उमेदवारांना कोणत्याही प्रकारचे दूरध्वनी/भ्रमणध्वनी कॉल करत नाही. उमेदवारांशी पत्रव्यवहार करावा लागला तर संबंधित प्राधिकरणाद्वारेच केला जातो. उमेदवारांनी त्यांची वैयक्तिक माहिती,नोंदणी क्रमांक, मोबाईल क्रमांक, ईमेल आयडी इतरांसमोर उघड करू नये. कोणत्याही अनैतिक दूरध्वनी/भ्रमणध्वनी कॉल्सपासून सावध राहावे. जास्तीत जास्त इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज संकेत स्थळावरुन भरावेत. अधिक माहितीसाठी www.indiapostgdsonline.gov.in या संकेस्थळाला भेट द्यावी. असे आवाहन नवी मुंबई डाकघर विभागाचे वरिष्ठ अधीक्षक यांनी एका प्रसिध्दी प्रत्रकाव्दारे केले आहे.

# भाजप पुरस्कृत हळदीकुंकू

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज घडवायचे असतील तर सर्वप्रथम माँसाहेब जिजाऊ तयार व्हायला हव्यात या विचारांना अनुसरून सलग १० वर्षे छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त महिलांसाठी भव्य हळदी कुंकू सभारंभ व विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.बुधवार १९ फेब्रुवारी रोजी सायं ठीक ५:३०वा. खेळाचे मैदान,सेक्टर ४६अ सिवूड नवी मुंबई येथे भाजपा पुरस्कृत सदर कार्यक्रमाचे आयोजन राजमाता जिजाऊ महिला मंडळाच्या अध्यक्षा अश्विनी दत्ता घंगाळे यांनी केले आहे.

# पळसदरी टोलनाक्याच्या जंगल भागात आढळले जनावरांचे सांगाडे व कातडी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत पोलिस ठाण्याच्या हद्दीत पळसदरी टोलनाक्याच्या जंगल भागाकडील निर्जन स्थळी गोवंश जातीच्या जनावराची कत्तल करून त्यांची सांगाडे व कातडी टाकलेली सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास सापडून आली आहेत.

महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा अधिनियम १९९५, भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम ३२५, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार काठे हे करीत आहेत.

# वीटभट्टीवर राबणाऱ्या अंजलीची विज्ञान प्रदर्शनात राज्य भरारी!

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील अति दुर्गम भागात असणाऱ्या रायगड जिल्हा परिषदेच्या झुगरे वाडी शाळेत इयत्ता आठवीत शिक्षण घेणाऱ्या अंजली भास्कर वाघ या विद्यार्थिनीने नुकत्याच झालेल्या तालुका, जिल्हा व राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात सरस कामगिरी बजावली आहे. या विज्ञान प्रदर्शनात अंजलीने तालुका व जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक पटकवला आहे. तर राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात तिच्या विज्ञान प्रकल्पाचे उत्कृष्टपणे सादरी करण केल्याने आयोजकांनी तिच्या पाठीवर कौतुकाची थाप देत तिचे मनापासुन कौतुक केले आहे.



रायगड जिल्ह्याचे शेवटचे टोक व कर्जत तालुक्यातील अती दुर्गम बहुलभाग असलेल्या झुगरेवाडी येथील अंजली वाघ ही शाळाबाह्य विद्यार्थिनी होती. हुशार असूनही केवळ परिस्थितीमुळे तिला आई वडिलां सोबत वीटभट्टी वर जावे लागले होते. अंजली हुशार असल्याने झुगारेवाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षक रवी काजळे व सतीश घावट यांनी तिच्या पालकांशी संपर्क साधून तिला कृपया शाळेत पाठवा असे सांगितले वडिलांनी ही शिक्षकांचे म्हणणे ऐकून तिला शाळेत पाठवण्यास सुरूवात केली.

शाळेत सर्व सोयी सुविधा उपलब्ध असल्याने अंजलीला अभ्यासाची व शाळेची आवड निर्माण झाली. यातूनच विज्ञान शिक्षक राजश्री पाटील व नंदादीप चोपडे यांनी तिच्यावर विश्वास ठेवून रस्ते सुरक्षा या प्रकल्पासाठी तिची तालुका, जिल्हा व राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड केली, आपल्या प्रभावी वक्तृत्वाची चमक दाखवत तिने तालुका व जिल्ह्यात आदिवासी गटातून प्रथम क्रमांक मिळवत, अमरावती येथील श्री शिवाजी विज्ञान विद्यालय येथील आयोजित राज्यस्तरीय ५२ व्या विज्ञान प्रदर्शनात विज्ञान प्रदर्शनात सहभाग घेतला.

झुगरेवाडी शाळेला राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात संधी मिळण्याची ही पहिलीच वेळ असल्याने मिळविलेले यश हे उल्लेखनीय आहे. अंजली हिला जर शिक्षकांनी शालेत आणले नसते तर शाळा एका गुणी विद्यार्थिनी मुकली असती.

# विद्यार्थ्यांसाठी पोषण आहार व पर्यावरण संवर्धनाचा शालेय परसबाग आदर्श उपक्रम

**श्रीवर्धन - प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील रानवली येथील जिल्हा परिषद शाळेने एक अनोखा आणि प्रेरणादायक उपक्रम हाती घेतला आहे. शाळेच्या परिसरात विद्यार्थ्यांनी परसबाग निर्माण केली असून, यामुळे शालेय पोषण आहाराची गुणवत्ता वाढण्या बरोबरच विद्यार्थ्यांची निसर्गाशी जवळीक निर्माण झाली आहे. ’प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना’ अंतर्गत शालेय परिसरातील ताज्या भाजीपाला आणि इतर उत्पादनांचा वापर शालेय पोषण आहारात केला जातो, ज्यामुळे कुपोषण कमी करण्यास मदत होत आहे.

शाळेतील परसबाग शालेय परिसरातील उपलब्ध जागेचा सर्वोत्तम वापर करून तयार करण्यात आली आहे. शाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी विविध प्रकारचे भाजीपाला, फळझाडे आणि मायक्रो ग्रीन यांचा उत्पादन घेतला जातो. पावसाळ्यात शालेय परिसरात पडवळ, घोसाळे, शिराळे, कारले, काकडी, दुधी व काळा भोपळा यांची लागवड केली जाते. हिवाळ्यात वांगी, टोमॅटो, गवार, मिरची, फ्लॉवर, कोबी, पालक, कोथिंबीर, मुळा, मेथी, माठ अशा अनेक प्रकारच्या भाजीपाल्याची लागवड केली जाते. शालेय परिसरात चवळी, मटकी, वाटाणा यांसारख्या मायक्रो ग्रीन भाजीपाल्याचीही लागवड केली जात आहे, ज्याचा वापर शालेय पोषण आहारासाठी होतो.



या उपक्रमामुळे शालेय परिसर निसर्गास साजेसा बनला आहे. जांब, चिकू, फणस, अननस, नारळ, केळी, लिंबू, पेरू आणि आंब्याच्या झाडांची लागवड केली गेली आहे. तसेच, ऑक्सिजन पार्कच्या माध्यमातून शालेय वातावरण अधिक शुद्ध व ताजे बनवले आहे. शालेय परिसरात शेवगा आणि कडीपत्ता अशी औषधी झाडेही उभी करण्यात आली आहेत. शाळेतील पर्यावरण संवर्धनाच्या कामात ’इको क्लब’ प्रमुख भूमिका निभावत आहे. या क्लबमध्ये ’राजमाता जिजाऊ गट’, ’राणी लक्ष्मीबाई गट’, ’अहिल्याबाई होळकर गट’, ’क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले गट’, ’महात्मा ज्योतिबा फुले गट’, ’छत्रपती शिवाजी महाराज गट’, ’डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम गट’, ’धर्मवीर संभाजी महाराज गट’ असे आठ गट तयार करण्यात आले आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता वाढवली जात आहे.

परसबागेतील उत्पादनांमुळे शालेय पोषण आहाराला चव आणि पौष्टिकता मिळत आहे. जादा भाजीपाला शालेय परिसरात विकला जातो आणि त्यातून मिळालेला पैसा शालेय विकासासाठी वापरला जातो. यामुळे शालेय विकासाला चालना मिळत आहे. शाळेच्या व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत आणि पालक यांचे सहकार्य या उपक्रमासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे.

शाळेतील ४४ विद्यार्थी आणि ४ शिक्षक या उपक्रमात सक्रियपणे सहभागी होऊन शालेय परसबागला यशस्वी बनवण्याचा प्रयत्न करत आहेत. या उपक्रमामुळे शाळेच्या परिसरातील वातावरण आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याची स्थिती निश्चितच सुधारली आहे.

शाळेने तयार केलेला परसबाग हे एक आदर्श मॉडेल आहे, जे पर्यावरण संरक्षण, पोषण आहार आणि विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक विकासात महत्त्वाची भूमिका निभावत आहे. यामुळे इतर शाळांना देखील अशा प्रकारचे उपक्रम राबवण्यासाठी प्रेरणा मिळेल.

**प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेसाठी पालक, ग्रामस्थ आणि ग्रामपंचायत यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले आहे. परसबाग संवर्धनासाठी इको क्लब कार्यरत आहे, ज्यात चार ते पाच विद्यार्थ्यांचा गट तयार करण्यात आले आहेत. प्रत्येक गटाला शालेय परिसराचा एक भाग नेमून दिला आहे. शालेय परिसर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती सक्रियपणे कार्य करत आहे.**

**-भिकू पांगारकर, शिक्षक,**

**पान १ वरुन**

## नवी मुंबई मनपा कंत्राटी कामगारांचा वेतन प्रश्न लवकरच मार्गी लागणार

नवी मुंबई महापालिकेतील कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत महापालिका आयुक्तांच्या स्तरावर समिती गठित करण्यात आली आहे. या समितीचा अहवाल लवकर महापालिकेकडे सादर केला जाणार आहे. समितीच्या अहवालानंतर कंत्राटी कामगारांच्या वेतनाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावला जाईल, असे मंत्री फुंडकर म्हणाले. कंत्राटी कामगारांच्या वेतनाचा विषय हा त्या त्या महानगर, नगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीशी संबंधित असल्याने आयुक्तांनी कामगारांच्या वेतन प्रश्नांवर सहानुभूतीने विचार करावा, असेही त्यांनी सांगितले.

## महेश बालदी आमदार झाल्यानंतर उरण मतदारसंघात विकासाची गंगा

यापूर्वी उरण मतदारसंघामध्ये विकासाचे ठोस काम कोणी केले नव्हते, परंतु जेव्हापासून महेश बालदी मतदारसंघाचे आमदार म्हणून निवडून आले तेव्हापासून या मतदारसंघाचा कायापालट करण्याचे काम त्यांनी हाती घेतले आणि म्हणूनच आपण सर्वांनी त्यांना पुन्हा एकदा मतदारसंघाची धुरा त्यांच्या हाती सुपूर्द केली, असे भाजप नेते किरण माळी यांनी सांगितले.

या भूमिपूजन सोहळ्याला माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत, माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, तनुजा टेंबे, कराड ग्रामपंचायतीचे माजी सरपंच किरण माळी, विजय मुरकुटे, भगवान देशमुख, योगेश पाटील, दत्तात्रय देशमुख, शरद देशमुख, प्रदीप देशमुख, पंचायत समिती विभागीय अध्यक्ष संदीप पाटील, कृष्णा कोंडिलकर, गणेश सरदार, उमेश सरदार, कैलास देशमुख, आनंद देशमुख, गोविंद गजानन, हरिभाऊ देशमुख, दिलीप देशमुख, रघुनाथ देशमुख, बाळकृष्ण साठे, रत्नराज देशमुख, सुरेश देशमुख, शैलेश बर्वे, प्रकाश देशमुख, यशवंत देशमुख, सचिन देशमुख, इशा देशमुख, निकिता सरदार यांच्यासह सवणे ग्रामस्थ उपस्थित होते.



**क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या स्मृतिदिनानिमित्त पनवेल महापालिकेच्या नाट्यगृहात क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.**

**दुखवटा**

## रमाकांत उर्फ आप्पा काळे



**नागोठणे :** नागोठणे व्यापारी असोसिएशनचे ज्येष्ठ पदाधिकारी नागोठणे लायन्स क्लबचे सल्लागार रमाकांत शिवराम काळे उर्फ आप्पा काळे यांचे त्यांच्या वयाच्या वय ७४ व्या वर्षी रविवार दिनांक १६ फेब्रुवारी रोजी त्यांच्या निवासस्थानी दुःखद निधन झाले. त्यांच्या अंतयात्रेत विविध स्तरातील मान्यवर, लायन्स क्लबचे पदाधिकारी, व्यापारी वर्ग, ग्रामस्थ, आप्तेष्ट यांनी सहभागी झाले होते.त्यांच्या पश्चात मुलगा अजित, सुन, नात व नातू असा परिवार असून कै. आप्पा काळे यांची दशक्रिया विधी मंगळवार दि. २५ फेब्रुवारी रोजी आंबा घाट नागोठणे येथे उत्तरकार्य शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी रोजी राहत्या घरी नागोठणे येथे होणार असल्याची माहिती नागोठणे ग्रा पं.चे माजी सदस्य राष्ट्रवादीचे युवा नेते अतुल काळे यांनी दिली आहे.

## निवडक

### चिंचवण उड्डाणपुलावर अपघात

**पनवेल :** चिंचवण गावाच्या हद्दीतील उड्डाणपुलावर दोन वाहनांचा अपघात होऊन यामध्ये टेम्पोचालक जखमी झाल्याची घटना घडली आहे. पनवेल बाजूकडून पेण बाजूकडे खाद्यपदार्थाने भरलेला टेम्पो जात असताना त्याला औषध पोहोचवणे टेम्पो याने त्याला मागून धडक दिली. यामध्ये खाद्यपदार्थाने भरलेला टेम्पोमधील चालक जखमी झाला आहे. यामध्ये दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे.



### पनवेलमध्ये साई भजन संध्या

**पनवेल :** पनवेलच्या साई मंदिरात सुप्रसिद्ध गायक मनहर उधास यांच्या श्री साई भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सद्गुरु श्री साई नारायण बाबा संस्थेतर्फे बुधवारी (दि.१९) सायंकाळी ६ ते ८ या कालावधीत या श्री साई भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती चेअरमन खेमचंद गोपलानी, सेक्रेटरी रामलाल चौधरी, कोऑर्डिनेटर राम थदानी यांनी कळविले आहे.

# मालमत्ता कर थकवणाऱ्यांवर कारवाई सुरू

## पनवेल महापालिकेची धडक मोहीम

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेचा मालमत्ता कर न भरणाऱ्या आस्थापना विरोधात कडक कारवाई करण्यास पनवेल महानगरपालिकेने सुरूवात केली आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार मालमत्ता कर न भरलेल्या थकबाकीदारांना जप्तीपुर्व नोटीसा व वॉरंट बजावण्यास पालिकेने सुरूवात केली आहे. तसेच जप्ती कारवाईसदेखील सुरुवात करण्यास सुरूवात करण्यात आली आहे. ज्या आस्थापनांचा मालमत्ता कर अधिक भरणे आहे, अशा आस्थापना पालिकेच्या रडारवरती असून येत्या काही दिवसांमध्ये अशा आस्थापनांवर जप्तीची कारवाई करण्यात येणार आहे.



महापालिका क्षेत्रात चारही प्रभागामधील सुमारे तीन लाख ५० हजार मालमत्तांना कर आकारणी करण्यात आली आहे. यामधील ज्या आस्थापनांचा अधिक मालमत्ता कर देणे बाकी आहे अशा आस्थपनांना मालमत्ता कर विभागाच्या जप्ती पथकाच्या कर्मचारी जप्ती पूर्व नोटीसा व वॉरंट बजावत आहेत. या पथकांनी आजपर्यंत चारही प्रभागामध्ये एकुण ४४७ जप्तीपूर्व नोटीसांचे वाटप केले असून २७ वॉरंट बजावण्यात आले आहेत. यामध्ये नुकतीच तळोजा येथील मे.वॉलरेक मॉड्यूलर सिस्टक कंपनीवरती जप्तीची कारवाई करण्यात आली आहे.

सध्याच्या आर्थिक वर्षामध्ये एप्रिल महिन्यापासून आजपर्यंत ३२६ कोटी इतकी वसुली झाली आहे. मालमत्ता कर हा महापालिकेचा एकमेव आर्थिक स्त्रोत असल्याकारणाने मालमत्ता कर उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली विभाग प्रमुख, जप्ती पथकामधील अधिकारी, कर्मचाऱ्यांना सुट्टी न घेता काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पथक अधिकाऱ्यांना त्यांच्या अधीनस्त असलेल्या सर्व मालमत्ताधारकांना प्रवृत्त करुन लवकरात लवकर महानगरपालिकेस मालमत्ता कराचा भरणा करून महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन केले जात आहे. मालमत्ता कराचा भरणा न केल्यास जप्ती व अटकावणी कारवाई करण्यात येईल, अशा सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२८ व अनुसूची ड प्रकरण ८ कराधान नियम ४७ अन्वये महानगरपालिकेस देय असलेल्या कराच्या थकबाकी पोटी जंगम स्थावर मालमत्ता जप्त अथवा अटकावणी करुन जाहिर लिलावाने विक्री करून थकबाकी वसूल करणेची तरतूद महानगरपालिकेस आहे. त्यानूसार नोटीस देऊनही मालमत्ता कराचा भरणा न केलेल्या थकबाकीदारांना उपायुक्तांच्या सूचनेनूसार, कर अधीक्षक महेश गायकवाड व करअधीक्षक सुनिल भोईर यांच्या जप्ती पथकामार्फत खारघर, उपविभाग नावडे, कळंबोली कामोठे, पनवेल व नवीन पनवेल प्रभागामधील थकबाकीदारांना जप्ती व अटकावणीची कारवाई करण्यात येत आहेत.

महापालिकने मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी 'PMC TAX APP' मोबाईल ॲप विकसित केले आहे. तसेच www. panvelmc.org या वेबसाईटवरती जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे. मालमत्ताधारकांना काही शंका असल्यास १८००-५३२०-३४० या टोल फ्री क्रमांवरती संपर्क साधावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

**नागरिकांना आवाहन**

महापालिकेच्या सर्व प्रस्तावित कामांसाठी मालमत्ता कर हा प्रमुख स्त्रोत आहे. मालमत्ता कर न भरल्यास त्याच्या शास्तीमध्ये प्रतिमहा दोन टक्क्यांची वाढ होत असल्याने नागरिकांनी आपला मालमत्ता कर भरावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# पनवेलमध्ये आरोग्य तपासणी शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील सिटिझन्स युनिटी फोरम व बिरमोळे मेडिकल फाउंडेशन ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने बिरमोळे हॉस्पिटल येथे आयोजित केलेल्या आरोग्य शिबिरात सुमारे २०० रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

या शिबिरामध्ये क्ष किरण तपासणी, हृदय स्पंदन आलेख, रक्ताच्या, दमा आजाराच्या, अस्थि घनतेच्या व कंठग्रंथींच्या विविध चाचण्या करण्यात आल्या. या शिबिरामध्ये बिरमोळे हॉस्पिटलमधील तज्ञ डॉक्टर व धवल शाह, श्रीजा नायर, गिरीश धांडे, पराग पाटील, समीर सहस्त्रबुद्धे, फारुकी, गणेश हांडे, कुणाल पेशेट्टीवार या नामवंत डॉक्टरांनी सहभाग नोंदवला.

कफचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच बिरमोळे हॉस्पिटल मधील प्राजक्ता वातारे, कांचन पुजारी, केतकी बावने व सर्व कर्मचारीवर्ग यांनी शिबिराच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

# पनवेलमध्ये ठाकरे गटाला धक्का

## तालुकाप्रमुख रघुनाथ पाटील शिवसेनेत

**उरण : रामप्रहर वृत्त**

उबाठा गटाचे पनवेल तालुकाप्रमुख रघुनाथ पाटील यांनी अनेक पदाधिकाऱ्यासह रविवारी रात्री उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला. त्यांचे पक्षात स्वागत करण्यात आले. या वेळी यांच्यासह विभागातील अनेक पदाधिकाऱ्यांनीदेखील शिवसेनेमध्ये प्रवेश केला.



गेली अनेक वर्षे शिवसेनेमध्ये सर्वसामान्य कार्यकर्ता ते तालुकाप्रमुख असा प्रवास केला होता. उबाठा गटात आपल्याला न्याय मिळू शकला नाही. त्यामुळे आता वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणाऱ्या शिवसेनेमध्ये प्रवेश करत असल्याचे रघुनाथ पाटील यांनी या वेळी सांगितले.

कार्यक्रमास खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेंद्र थोरवे, रायगड जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



**पनवेल : भाजपच्या संघटन पर्व सदस्य नोंदणी अभियानांतर्गत पनवेल विधानसभा मतदारसंघाने आमदार प्रशांत ठाकूर व भाजपचे जिल्हाध्यक्ष यांच्या नेतृत्वाखाली १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण केले आहे. या सदस्य नोंदणीत आमदार प्रशांत ठाकूर सक्रिय सदस्य झाले असून त्या संदर्भातील सक्रिय सदस्य फॉर्म त्यांनी भाजपचे शहर अध्यक्ष अनिल भगत यांच्याकडे त्यांनी सुपूर्द केले. या वेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, पनवेल विधानसभा निवडणूक प्रमुख व जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेवक अजय बहिरा, जिल्हा चिटणीस अमरीश मोकल आदी उपस्थित होते.**





**पनवेल : अंकुश सावंत आणि ओमकार बैकर या तरुण मित्रांनी मिडलक्लास हाऊसिंग सोसायटी येथील गोल्डन ड्रीम लँड आर्किट येथे व्हिजन इलेक्ट्रॉनिक्स दुकान सुरू केले आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते या दुकानाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख आदी उपस्थित होते. दरम्यान, या दुकानाला आमदार प्रशांत ठाकूर यांनीही भेट दिली. या वेळी माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, भाजपचे युवा नेते हॅपी सिंग, मल्हार नेटवर्कचे संचालक स्वप्नील ठाकूर आदी उपस्थित होते.**




**पनवेल : सकल मराठा समाज मंडळ खांदा कॉलनी यांच्या वतीने आयोजित मराठमोळा पोवाडा आणि शाहिरी गीतांचा कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि जोशपूर्ण वातावरणात झाला. रायगड भूषण, शिवभूषण शाहीर वैभव घरत यांनी शिवरायांचे पराक्रम, हिंदवी स्वराज्याचे तेज आणि मराठ्यांच्या गौरवशाली इतिहासाचे दर्शन घडवले. दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शाहीर वैभव घरत यांचा या वेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास भीमराव पोवार, संतोष जाधव, शिवाजी दांगट, राजू मोरे, शिवाजी पाटील, राजेंद्र कुळे आदी उपस्थित होते.**

# गुळसुंदे येथे गजानन महाराज प्रकट दिन

**रसायनी : प्रतिनिधी**

रसायनी परिसरातील गुळसुंदे येथे गजानन महाराज प्रकट दिन सोहळा गुरुवारी (दि.२०) आयोजित करण्यात आला आहे.



यंदाचे हे सोळावे वर्षे असून या वेळी पहाटे चार ते सहा काकड आरती, सकाळी आठ ते नऊ मंगलस्थान पूजा व रुद्राभिषेक, दुपारी एक ते दोन हळदीकुंकू समारंभ, संध्याकाळी चार ते सहा पालखी सोहळा दिंडी, सायंकाळी सहा ते साडेसात सामुदायिक हरिपाठ व आरती, रात्री साडेसात ते साडेआठ महाप्रसाद, रात्री नऊ ते ११ हभप प्रकाश महाराज ठाकूर केळवणे यांचे कीर्तन असा हा असा कार्यक्रम आहे.

या वेळी प्रमुख अतिथी म्हणून आमदार महेश बालदी, लोना कंपनीचे मॅनेजर जी.एस. मेणसे, उद्योजक गणेश वर्तक, डिंपल ड्रम्स कंपनीचे दिनेशशेठ कोठारी, गुळसुंदे सरपंच मीनाक्षी जगताप-पाटील, उपसरपंच अरुणा पाटील उपस्थित राहणार आहेत, असे उत्सव समितीचे अध्यक्ष नामदेव मांडवकर यांनी सांगितले. सोहळा यशस्वी करण्यासाठी सर्व कमिटी व सोसायटीतील रहिवासी परिश्रम घेत आहे.

# ज्ञानमंदिर विद्यालयात मातृ-पितृ पूजन

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे ज्ञानमंदिर कळंबोली विद्यालयाच्या वतीने मातृ-पितृ पूजन या कार्यक्रमाचा आयोजन करण्यात आलेले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्यात्या शुभांगी भिडे (आर्किटेक्ट) मॅडम उपस्थित राहिल्या. त्यांनी उपस्थित पालकांना व विद्यार्थ्यांना नमस्कार कसा करावा याची माहिती दिली.



या वेळी त्यांनी मार्गदर्शन करताना हळदी कुंकवाचे महत्त्व समजावून दिले. सूर्यनमस्काराचे महत्त्व समजावून सांगितले. शारीरिक आरोग्य व मानसिक आरोग्य याचे महत्त्व पटवून दिले. आपण विद्यार्थ्यांबरोबर कसं वागायला हवंय. त्याचबरोबर आपल्या दिवसाची सुरुवात कशी करावी. कोणत्या गोष्टी कराव्यात,या पेक्षा कोणत्या करू नयेत, याविषयी सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या आई-वडिलांचे पूजन विद्यालयात केले. हळद-कुंकू लावून, फुले त्यांच्या चरणावर वाहून, पेढा भरवून मुलांनी पालकांचे औक्षण केले. आई-वडिलांचे दर्शन घेतले. या वेळी भारत विकास परिषदेचे अध्यक्ष सुबोध भिडे कार्यक्रमास उपस्थित होते.

कार्यक्रम होण्यासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका संजना बाईत यांचे मोलाचे सहकार्य लाभले. अशा पद्धतीने विद्यालयात मातृ-पितृ पूजन हा कार्यक्रम अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.

# विद्यार्थ्यांनी परीक्षेत उत्तुंग यश संपादन करावे -अरुणशेठ भगत

## गव्हाण विद्यालयात शुभचिंतन सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी सुयश चिंततानाच विद्यार्थ्यांनी भावी आयुष्यातदेखील उत्तुंग यश संपादन करावे, असे आवाहन कार्यक्रमाचे अध्यक्ष व विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य तथा जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी केले.



ते रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनियर कॉलेज मध्ये सोमवारी (दि.१७) एस.एस.सी.बोर्ड परीक्षा मार्च २०२५ ला प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन समारंभात बोलत होते.

कार्यक्रम मुख्य वक्ते म्हणून पनवेल येथील सीकेटी विद्यालयाचे प्राचार्य कैलास सत्रे उपस्थित होते. या वेळी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य विश्वनाथ कोळी, गव्हाण ग्रामपंचायतचे उपसरपंच विजयशेठ घरत, माजी सरपंच माई भोईर, ज्येष्ठ नेते जयवंतराव देशमुख, वामनशेठ म्हात्रे, इंदुमती म्हात्रे, स्वरा कॉम्प्युटर्सच्या संचालिका सुमती घरत, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष कुंदन मोकल, विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे, न्हावे शाखे चे मुख्याध्यापक रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर प्रमोद कोळी, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रविंद्र भोईर, विधिज्ञ रुपेश म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज प्रमुख बाबुलाल पाटोळे, ज्युनिअर कॉलेजचे सर्व शिक्षक सर्वश्री राजेंद्र चौधरी, माणिक घरत, राजू खेडकर, उमेश पाटील, जयवंती ठाकूर, अर्चना पाटील, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, एकनाथ ठाकूर, चित्रलेखा पाटील, योगिता पाटील, गुरुकुल प्रमुख संदिप भोईर, जागृती पाटील, रिद्धी म्हात्रे तसेच सर्व शिक्षक विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी आवर्जून उपस्थित होते.

या वेळी इयत्ता नववीच्या प्रतिनिधी संस्कृती शेरमाळे व अनुष्का आव्हाड, इयत्ता दहावीचे प्रतिनिधी युवराज पवार, गुलनाज मन्सुरी, आरोही कोळी यांनी अनुक्रमे मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांमधून भाषणे केली. शिक्षक प्रतिनिधी संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर यांचेही समयोचित भाषण झाले. तसेच स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य विश्वनाथ कोळी व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर प्रमोद कोळी यांनीही आपल्या भाषणांतून शुभेच्छा दिल्या.

मुख्याध्यापक कैलास सत्रे यांनीही आपल्या मुख्य भाषणात विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात यशस्वी व्हावे आणि आयुष्यात कधीही आपल्या शाळेला आणि शिक्षकांना विसरु नये, असे आवाहन केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांनी प्रास्ताविकातून विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने आपण जगात वावरले पाहिजे, असे सांगितले.

इयत्ता दहावी ब मधील दिक्षा वर्तक या विद्यार्थिनीने संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी चित्रलेखा पाटील, सागर रंधवे, संदीप भोईर व योगिता पाटील यांनी परिश्रम घेतले. आभार सागर रंधवे यांनी केले.

## संपादकीय

# चेंगराचेंगरीमागे कटकारस्थान?

प्रयागराजचा महाकुंभ हा श्रद्धा आणि धार्मिकतेचा अनोखा संगम ठरला असून १३ जानेवारीपासून प्रारंभ झालेल्या महाकुंभात आतापर्यंत ५१ कोटींहून अधिक भाविकांनी पवित्र स्नान केले आहे. एकीकडे सनातन धर्माच्या या सर्वात मोठ्या आयोजनाचे साक्षी बनल्याचा आनंदयुक्त गर्व अनुभवणारे लोक आहेत तर दुसरीकडे काही लोक या सोहळ्याची निव्वळ बदनामी करण्यास टपलेले आहेत. त्यामुळेच नवी दिल्ली रेल्वेस्थानकावरील चेंगराचेंगरी हे राजकीय षड्यंत्र होते का असा संशयही व्यक्त होतो आहे.

**नवी दिल्ली रेल्वे स्थानकात शनिवारी रात्री चेंगराचेंगरीची घटना घडली. या दुर्घटनेत १८ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती सरकारकडून देण्यात आली आहे. या दुर्दैवी घटनेने देशभरातील लोक हळहळले आहेत. परंतु आता या घटनेमागील कारणांसंदर्भात उलटसुलट दावे व आरोपप्रत्यारोप होऊ लागल्याने यामागे काही कटकारस्थान होते की काय, अशी शंकाही व्यक्त होते आहे. त्यामुळेच ही चेंगराचेंगरीची घटना नेमकी कशामुळे झाली याची चौकशी दिल्ली पोलिस आणि रेल्वे प्रशासनाने सुरू केली आहे. यापूर्वी मौनी अमावस्येच्या योगावर प्रयागराजच्या त्रिवेणी संगमावर स्नानासाठी झुंबड उडालेली असताना चेंगराचेंगरी होऊन काही लोकांचा बळी गेला व या महान धार्मिक सोहळ्याला गालबोट लागले. तेव्हाही विरोधकांनी उत्तर प्रदेशातील सरकारवर मृतांची संख्या लपवल्याचा आरोप केला होता. विरोधकांना प्रत्युत्तर देताना उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी काही नेते सनातन धर्माच्या विरोधात खोटारडेपणाचे व दुष्प्रचाराचे षड्यंत्र रचण्यातच मग्न आहेत असे म्हटले होते. शनिवारच्या चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेनंतर माजी केंद्रीय रेल्वे मंत्री आणि राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख लालू प्रसाद यादव यांनी रेल्वेच्या गैरव्यवस्थापनामुळे ही दुर्घटना घडल्याचा आरोप करतानाच, कुंभला काही अर्थ आहे का, फालतू आहे कुंभ, असे वक्तव्य केले. त्यांची जीभ ही अशी घसरल्यामुळे नव्या वादाला आता तोंड फुटले आहे. हिंदु धर्मियांसाठी सर्वात पवित्र असलेल्या या मेळ्यासंदर्भात बोलताना एका ज्येष्ठ नेत्याची जीभ अशातऱ्हेने घसरावी हे कशाचे द्योतक आहे असा प्रश्न विचारला जातो आहे. गर्दीचा मोठा रेटा आल्याने नवी दिल्ली रेल्वे स्थानकात काही जणांचा तोल गेला आणि ते खाली कोसळले असे प्रत्यक्षदर्शींकडून सांगितले जाते आहे. परंतु गोंधळ नेमका कशामुळे उडाला, गर्दीचा रेटा का निर्माण झाला हे अद्याप स्पष्ट झाले नसून त्यासंदर्भात वेगवेगळे आरोपप्रत्यारोप केले जात आहेत. रेल्वेकडून दर तासाला तब्बल १५०० तिकिटांची विक्री झाल्यामुळे गर्दी अचानक वाढल्याचे सांगितले जाते आहे. तर रेल्वेगाड्यांची नावे सारखी असल्यामुळे उद्घोषणेनंतर नेमकी आपली गाडी कोणती याविषयी प्रवाशांचा गोंधळ उडून चेंगराचेंगरी सुरू झाली असाही दावा केला जातो आहे. प्लॅटफॉर्म क्रमांक १४ आणि १५ यांना जोडणारा जिना अरुंद होता. एकाच वेळी हजारो प्रवाशांनी या जिन्याच्या दिशेने गर्दी केल्याने चेंगराचेंगरी झाली असावी असाही अंदाज व्यक्त होतो आहे. अशी निरनिराळी कारणे सांगितली जात असल्यामुळे दुर्घटनेच्या चौकशीसाठी समिती स्थापन केल्याची घोषणा रेल्वेने केली आहे. त्या दुर्घटनेशी संबंधित सर्व ध्वनिचित्रफिती ताब्यात घेण्याचे आदेश देण्यात आले असून सीसीटीव्ही चित्रीकरण तपासून गोंधळ नेमका कशामुळे उडाला ते शोधले जाईल असे रेल्वेकडून सांगण्यात आले आहे.**

# महाडच्या हापूस तळ्याचा होणार कायापालट



**खबरबात**
महेश शिंदे

महाड शहरातील गांधारी नाका परिसरात असलेले जुने हापूस तळे आता कात टाकणार आहे. महाड नगरपालिकेने हापूस तळ्याचे सुशोभिकरण करण्याचे काम २०१९ मध्ये हाती घेतले होते मात्र हे काम रखडले होते. आता पुन्हा या कामासाठी जवळपास चार कोटी रुपये मंजूर झाले असून या प्रकल्पामुळे महाड शहराच्या सौंदर्यीकरणात भर पडणार आहे.

महाड शहरातील विविध भागात अनेक प्राचीन तळी आहेत त्यातील चवदार तळे जागतीक नकाशावर आहे. गांधारी नाका परिसरात महाड शहरात प्रवेश करणा-या मुख्य रस्त्यालगत हापूस तळे आहे. महाड हे बौद्धकालीन व्यापारी शहर म्हणून ओळखले जाते. व्यापारी केंद्र म्हणून महाडची ओळख बनली आहे. जवळच असलेल्या बंदरावर शिवकाळा आधीपासून मोठी गलबते येत होती. हबशी लोक महाडमध्ये येवून या तळ्यात अंघोळ करत होते म्हणून या तळ्याचे नाव हबस तळे असे पडले आणि कालांतराणे हबस तळ्याला हापूस तळे म्हणून महाड मध्ये ओळखले जावू लागले.

हापूस तळे हे काळाच्या ओघात बुजले गेले. तर तळ्यात रानटी वनस्पतीही उगवलेल्या होत्या. परिसरातील इमारतींचे सांडपाणीही या तळ्यात जात होते. इतिहास काळात महाड हे बंदर होते. व येथून मोठ्या प्रमाणात धान्ये व वस्तुची उलाढाल होत असे. त्याकाळी रस्ते पूल या सुविधा नव्हत्या. तेव्हा होडीनेच सामानाची वाहतूक होत असे. या होड्यांवर हबशी म्हणून काम करणारे या ठिकाणी पाण्याची सोय असल्याने मुक्कामाला उतरत असत. काम संपल्यावर माघारी जात त्यामुळे या तळ्याला हाबूस व नंतर हापूस तळे असे नाव पडल्याचे जूने जाणकार सांगतात. असे हे तळे अनेक वर्षे दुर्लक्षित झाले होते. आता या तळ्याचा विकास नगर पालिकेने हाती घेतला आहे. नगरोत्थान अंतर्गत सव्वा कोटी रुपये यासाठी खर्च होणार होते. २०१६ साली याला प्रशासकिय मंजुरी मिळाली मात्र कांहीं तांत्रिक कारणास्तव हे काम रखडले होते. सध्या तळे साफ करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. तळ्याचे खोदकाम देखील सुरू असून सभोवताली गॅब्रियन वॉल बांधल्या जाणार आहेत. तळ्याच्या भोवती सुमारे पाचशे मिटरच्या लांब व सोडेचार फूट रुंद ट्रॅक राहणार आहे, भोवताली बाग, स्वच्छतागृह, पाय-या व बाजूने सांडपाणी झिरपू नये यासाठी गटारांची सुविधाही केली जाणार आहे. यामुळे गांधारीनाका परिसरही सुशोभित होण्यास मदत मिळणार आहे. चवहार तळे व रायगडकडे येणा-.या पर्यटकांसाठीही या ठिकाणाचा उपयोग होईल. मात्र या तळ्याच्या सुशोभीकरणाचे काम गेली दोन वर्ष रखडले होते. तळ्याशेजारी असलेल्या जागा हि खाजगी जागा असून या जागेवरून पालिका आणि जमीन मालकामध्ये चर्चा करून तोडगा काढण्यात आला आहे.

महाडमधील महापुरात या तळ्याचे देखील नुकसान झाले. नदीपासून जवळच असलेल्या या तळ्यामध्ये देखील चिखल अडकून पडला होता. शिवाय तळ्याच्या चहुबाजूने पावसाळ्यात वाढलेली झुडपे आणि कोसळलेले झाड तसेच पडून आहे. सुशोभीकरणातील फुटपाथ तयार केला असला तरी फुटपाथ देखील महापुरामुळे खराब झाला आहे. मात्र हाती घेतलेले तलावाचे हे काम पुर्ण झाल्यानंतर महाड शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे.

# क्रांतिकारक मदनलाल धिंग्रा



कर्झन वायली या इंग्रज अधिकाऱ्याचा वध करणारे हुतात्मा मदनलाल दित्तमल धिंग्रा १७ ऑगस्ट १९०९ रोजी हसत हसत फासावर चढले. १ जुलै १९०९ रोजी पिस्तुलाच्या चार गोळ्या झाडून धिंग्राजींनी कर्झन वायलीचा वध केला होता. 'एका इंग्रज अधिकार्याचा भारतीय क्रांतियोद्धय़ाने केलेला वध' एवढेच केवळ या घटनेचे महत्त्व नाही, तर हा होता अजिंक्यतेचा तोरा मिरवणार्या ब्रिटिशांच्या भूमीवर राहून त्यांच्याच एका अधिकार्याचा केलेला वध! ही अभूतपूर्व अशीच घटना होती . या घटनेनंतर सबंध हॉलमध्ये पळापळ माजलेली असताना मदनलालजींची नाडी सामान्य गतीनेच चालत होती. एवढेच काय, तर त्यांना अटक करून ठाण्यात नेल्यावरही ते पाचच मिनिटांत घोरू लागले होते. धिंग्राजींची झडती घेऊन त्यांच्याजवळ सापडलेल्या एकूण एक वस्तू जप्त करण्यात आल्या होत्या. त्यातच धिंग्राजी ज्यांना गुरुस्थानी मानत त्या स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लिहून दिलेले कोर्टात मांडावयाचे निवेदन लहरश्रश्रशपसश हेही गेले. पुढे न्यायी (!) इंग्रज शासनाने ते निवेदन दाबून टाकले व कोर्टात मांडूच दिले नाही.

इथे एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे ती म्हणजे वायलीला धिंग्राजींनी मारले १ जुलै १९०९ ला. धिंग्राजींना फाशी झाली ती २९ जुलैला. फाशी देण्यात आली ती १७ ऑगस्ट १९०९ ला. म्हणजे अवघ्या महिनाभरातच इंग्रज शासनाने त्यांच्या दृष्टीने शत्रू असलेल्या क्रांतिवीरास फाशी जाहीर केली व दीडच महिन्यात तिची अंमलबजावणीही करून टाकली. धिंग्राजींच्या कृत्यामुळे जगभरात इंग्लंडची अब्रू गेलीच होती. उरलेली अब्रू वाचवण्यासाठी ५ तारखेला धिंग्राजींचा निषेध करणारी सभा घेण्याचा प्रयत्न केला गेला, तर तोही स्वा. सावरकरांनी हाणून पाडला. तोपर्यंत इंग्रज याच भ्रमात होते की, धिंग्राजींच्या अखेरच्या निवेदनाच्या सर्व प्रती आपण जप्त करून टाकल्या आहेत. जेव्हा धिंग्राजींच्या फाशीच्या आदल्या दिवशी, म्हणजे १६ ऑगस्ट १९०९ ला 'डेली मेल'मध्ये जेव्हा सावरकरांनी धिंग्राजींचे निवेदन प्रसिद्ध करविले, तेव्हा तर ब्रिटिश शासन कोलमडलेच. ज्या आपल्या निवेदनानंतर धिंग्राजी जगभरच्या क्रांतिकारकांचे प्रात:स्मरणीय प्रेरणास्थान झाले, त्यात ते म्हणतात :''एक हिंदू म्हणून माझी भावना अशी आहे की, माझ्या देशाचा अपमान हा परमेश्वराचाच अपमान होय.

कृश प्रकृतीच्या आणि सामान्य बुद्धिमत्तेच्या अशा मजसारख्या भारतपुत्राजवळ मायभूमीसाठी देता येईल असे काही असलेच तर ते केवळ स्वत:चे रक्तच होय. तेच मी माझ्या मातृभूमीच्या वेदीवर अर्पिले आहे! माझ्या मातृभूमीचा पक्ष हा प्रभू रामचंद्रांचा पक्ष आहे. तिची सेवा ही प्रत्यक्ष भगवान र्शीकृष्णाचीच सेवा आहे. हिंदू आणि इंग्लिश हे दोन वंश अस्तित्वात आहेत आणि त्यांच्यात सध्या असलेले हे अनैसर्गिक राजकीय संबंध कायम आहेत, तोपर्यंत हा स्वातंत्र्यसंग्राम चालूच राहील.

आत्मबलिदान कसे करावे ही एकच शिकवण सध्या हिंदुस्थानला शिकवण्यायोग्य आहे आणि ते शिकवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे स्वत:चे बलिदान देऊन मोकळे होणे होय! याच जाणिवेने प्रेरित होऊन मी प्राणार्पण करीत आहे व माझ्या हौतात्म्याचा मला अभिमान आहे. या भारतभूची संतान म्हणून मला पुनर्जन्म प्राप्त होवो व याच पवित्र कार्यात माझा देह पुन्हा पडो एवढीच माझी परमेश्वरचरणी प्रार्थना आहे.''

धिंग्राजींचे हे ओजस्वी निवेदन मुळातूनच सर्वांनी वाचण्याजोगे आहे. तीच मदनलाल धिंग्रा यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

## बदलते तंत्रज्ञान



# फास्टॅगचे नवीन नियम झाले लागू; काळजी घ्या




फास्टॅग बॅलन्स व्हॅलिडेशनचे नविन नियम फेब्रुवारी २०२५ पासून लागू झाले आहेत या नवीन नियमांचे उद्दिष्ट टोल व्यवहार सुलभ करणे तसेच फसवणूक रोखणे हे आहे. त्यामुळे आता दंड टाळण्यासाठी खाजगी वाहनांनी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आता फास्टॅगबाबत अतिरिक्त काळजी घ्यावी लागणार आहे.

टोल प्लाझावर टॅग स्कॅन झाल्यानंतरच्या विशिष्ट वेळेत आता फास्टॅग व्यवहार वैध केले जातील. यासाठी दोन अटी लागू करण्यात आल्या आहेत. यामध्ये टॅग स्कॅन करण्यापूर्वी ६० मिनिटे आणि टॅग स्कॅन केल्यानंतर १० मिनिटे अशा दोन अटींचा समावेश आहे. जर टोल प्लाझावर पोहोचण्यापूर्वी एका तासापेक्षा जास्त काळ फास्टॅग ब्लॅकलिस्टेड, हॉटलिस्टेड किंवा त्यामध्ये कमी बॅलन्स असेल, तर शुल्क नाकारले जाईल आणि जर टॅग स्कॅन केल्यानंतरही १० मिनिटांपर्यंत निष्क्रिय किंवा ब्लॅकलिस्टेड राहिला तरीदेखील शुल्क नाकारले जाईल. अशा परिस्थितीत सिस्टम एरर कोड १७६ दाखवले आणि युजरकडून दंड म्हणून टोल शुल्काच्या दुप्पट रक्कम आकारली जाईल.

नव्या नियमांनुसार फास्टॅग व्हाइटलिस्टेड (सक्रिय), ब्लॅकलिस्टेड (निष्क्रिय) असेल. अशात जर फास्टॅगमध्ये अपुरा बॅलेन्स, घधउ झाली नसेल किंवा वाहन नोंदणी तपशीलांमध्ये तफावत आढळली तर तो ब्लॅकलिस्टेड केला जाईल. नवीन नियमांनुसार, जर तुमचे वाहन टोल बूथवर पोहोचण्यापूर्वी फास्टॅग ६० मिनिटांपेक्षा जास्त काळ ब्लॅकलिस्ट केला गेला असेल तर तो शेवटच्या क्षणी रिचार्ज करता येणार नाही. पण, टॅग स्कॅन करण्याचा प्रयत्न केल्यानंतर१० मिनिटांच्या आत टॅग रिचार्ज केल्यास युजरला टोल शुल्क भरता येणार आहे. अशा परिस्थितीत दंड टाळता येणार आहे.फास्टॅग युजर्सनी दंड टाळण्यासाठी काय करावे?लांबच्या प्रवासाला सुरुवात करण्यापूर्वी फास्टॅग खात्यात पुरेसा बॅलेन्स शिल्लक ठेवा.

ब्लॅकलिस्टिंग टाळण्यासाठी केवायसी तपशील नियमितपणे अपडेट करा. टोल प्लाझावर पोहोचण्यापूर्वी फास्टॅगमध्ये किती बॅलेन्स आहे, तो सक्रिय आहे की नाही हे तपासा. या सर्व गोष्टींची काळजी घेतल्यास युजर्सना अनावश्यक दंड टाळता येणार आहे.

# लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख



## निमित्त

गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी हे मराठी पत्रकार, समाजसुधारक व इतिहासलेखक होते. त्यांचा जन्म १८ फेब्रुवारी १८२३ रोजी कोकणातील वतनदार घराण्यात झाला यांचे घराणे मूळचे कोकणातले वतनदार होते. घराण्याचे मूळचे आडनाव सिद्धये. त्यांच्या देशमुखी वतनामुळे देशमुख हे आडनाव रूढ झाले. गोपाळराव देशमुखांचे वडील हरिपंत देशमुख हे पुण्यात दुसर्या बाजीराव पेशव्यांचे सेनापती बापू गोखले यांचे फडणीस म्हणून काम करीत होते.

इतिहास हा त्यांचा आवडीचा विषय होता. त्यांनी या विषयावर एकूण १० पुस्तके लिहिली आहे त्यांना संस्कृत,फारसी,हिंदी,गुजराती भाषेचे चांगले ज्ञान होते.इंग्रजी शिक्षण घेणारे १९ व्या शतकातील पहिले नवशिक्षित गोपाळ हरी होते. त्यांनी मराठी शाळेत शिक्षण घेत असतानाच इंग्रजीचा अभ्यास केला. त्यांच्या वयाच्या २१ व्या वर्षी ते न्यायालयात भाषांतरकार झाले. 'सदर अदालती' ची मुन्सिफीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर १८६२ पासून ते मुंबई सरकारच्या न्यायखात्यात न्यायाधीश झाले. त्या पदावर त्यांनी अहमदाबाद, नाशिक आणि सातारा येथल्या कोर्टांत काम केले.श्रमातून संपत्ती निर्माण होते या सूत्रातून गोपाळराव देशमुखांना दारिद्र्य निर्मूलनासाठी काय करायला पाहिजे याची दिशा समजली. हिंदुस्थानात ज्ञानाबरोबरच तंत्रज्ञान व नाना प्रकारचे उद्योगधंदे वाढावेत ही त्यांची तळमळ होती. स्वदेशात विद्यावृद्धी होऊन स्वभाषेत नवे नवे ज्ञान प्रसारित झाल्याशिवाय हिंदुस्थानला जगातील इतर प्रगत राष्ट्रांच्या बरोबरीचे स्थान मिळणार नाही, असे त्यांना तीव्रतेने वाटे. 'हिस्टरी ऑफ द ब्रिटिश एम्पायर इन इंडिया' या पुस्तकाच्या आधारे त्यांनी १८४२ मध्ये म्हणजे वयाच्या १९ व्या वर्षी 'हिंदुस्थानचा इतिहास' हे पुस्तक लिहिले.

त्यांनी १०८ छोटे छोटे निबंध लिहिले. हेच निबंध लोकहितवादींची शतपत्रे नावाने ओळखले जातात. या शतपत्रांच्या माध्यमातून त्यांनी समाजसुधारणाविषयक विचार समाजासमोर मांडले. ही शतपत्रे प्रभाकर या साप्ताहिकातून प्रसिद्ध झाली. धार्मिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, वाङ्मयीन, ऐतिहासिक इत्यादी विषयांवर त्यांनी लहानमोठे असे सुमारे ३९ ग्रंथ लिहिले.लोकहितवादींनी अनेक उत्कृष्ट इंग्रजी ग्रंथांचे मराठीत भाषांतर केले. त्यांच्या लेखनातून लोकांच्या सर्वांगीण उन्नतीची तळमळ दिसून येते.जातिसंस्था हा देशाच्या उन्नती होण्याच्या मार्गातील मोठा अडसर आहे असे प्रतिपादन त्यांनी आपल्या लेखनातून केले.लोकहितवादी हे हिंदुस्थानातील अर्थशास्त्रज्ञ होते. मराठीतून लेखन करणारेही ते पहिलेच अर्थतज्ज्ञ. 'लक्ष्मीज्ञान' या ग्रंथाद्वारे त्यांनी ॲडम स्मिथ'प्रणीत अर्थशास्त्र वाचकांसमोर आणले. मातृभाषेतून शिक्षण या तत्त्वाचाही त्यांनी प्रसार केला.मराठीप्रमाणेच त्यांनी गुजरातीतही लिखाण केले आहे.भारतखंड पर्व,पाणीपत ची लढाई,हिंदुस्थानाचा इतिहास,गुजरात देशाचा इतिहास,लंकेचा इतिहास,सुराष्ट्र देशाचा ससाक्ष इतिहास,हे काही त्यांची साहित्ये आहेत. १८७७ साली दिल्ली दरबारप्रसंगी ब्रिटिश शासनाने रावबहादूर ही पदवी देऊन त्यांना सन्मानित केले होते. ९ ऑक्टोबर १८९२ रोजी या थोर समाजसुधारकाचे निधन झाले.

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# गुलाबाचे अनेक आरोग्यदायी फायदे



गुलाब हे आपल्या आरोग्यासाठी देखील खूप फायद्याचे आहे. गुलाबाचे अनेक फायदे आहेत. गुलाब हृदयाला हितकर असते, शुक्रवर्धक असते, पोट साफ होण्यास मदत करतो, शरीरातला दाह कमी करतो, रक्तदोष दूर करण्यास गुलाबाची मदत होत.


गुलाब हे आपल्या आरोग्यासाठी देखील खूप फायद्याचे आहे. गुलाबाचे अनेक फायदे आहेत. गुलाब हृदयाला हितकर असते, शुक्रवर्धक असते, पोट साफ होण्यास मदत करतो, शरीरातला दाह कमी करतो, रक्तदोष दूर करण्यास गुलाबाची मदत होत.

वाळलेल्या गुलाबाच्या कळ्या पाण्यात भिजत घालून, सकाळी ते पाणी गाळून प्यायलं असता पोट साफ होण्यास मदत मिळते. गोवर, कांजण्या किंवा उष्णतेमुळे ताप येऊन गेल्यावर शरीरात ताप शिल्लक राहू नये यासाठी गुलाबाच्या पाकळ्या भिजत घातलेलं पाणी पिण्याचा उपयोग होतो.

पित्त वाढण्याची समस्या असेल, म्हणजे उन्हात गेलं की डोकं दुखत असेल, वारंवार मायग्रेनचा त्रास होत असेल, तर आठवड्यातून एकदा तीन चमचे गुलाबाच्या पाकळ्या, सात आठ काळ्या मनुका आणि अर्धा चमचा सोनामुखीची पानं यांचा काढा घेतला, तर एक दोन जुलाब होऊन पित्त पडून जातं आणि पित्ताशी संबंधित विकार बरे होण्यास मदत मिळते.

डोळ्यांची आग होत असेल, स्क्रीनच्या अतिवापरामुळे डोळे थकत असतील, तर गुलाबपाण्यात भिजवलेल्या कापसाच्या घड्या डोळ्यांवर ठेवण्याचा उपयोग होतो. उष्णता वाढल्यामुळे डोकं दुखत असेल, तर कपाळावर, टाळूवर गुलाबजलच्या घड्या ठेवल्याने आराम मिळतो. अशा प्रकारे गुलाबाचा अनेक प्रकारांनी वापर करता येतो, मात्र त्यासाठी सुगंधी गुलाबच हवा. वास न येणारा गुलाब हा फक्त नावापुरता गुलाब.

# रेवदंडा पुलानजीक बुडालेले बार्ज धोकादायक!



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा-साळाव पुलानजीक गेले काही वर्षापासून बुडालेले बार्ज समुद्राच्या पाण्यातून बाहेर न काढल्याने तेथून जाणाऱ्या इतर लहान मोठया बोटी, बार्ज यांना ते धोकादायक ठरत आहे. याशिवाय या बार्ज अनेक वेळा पुलाला धडकत असल्याने पुल कमकुवत होत आहे . यामुळे भविष्यात दुर्घटना घडु शकते.

सदर बार्ज समुद्र भरतीचे वेळी पुर्णतः पाण्यात बुडत असल्याने रेवदंडा समुद्र किनारी परगावाहून ये-जा करत असलेल्या लहान मोठया बोटी, बार्ज यांचे निदर्शनास येत नाही. परिणामी या पाण्यातील बुडालेल्या बार्जला धडक बसून अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

रेवदंडा पुलानजीक काही वर्षापुर्वी बुडालेली बार्ज आहे, मात्र अपघाता नंतर संबधीतांनी सदर बार्ज समुद्रातून काढून बाहेर आणण्याची कोणतीही खबरदारी घेतली नाही. त्यामुळे ती आज ही पाण्यातच आहे, भरतीचे वेळी ही बार्ज पुर्णतः पाण्यात बुडते व तेथून जा-ये करणार्या बोटी, बार्ज याचे निदर्शनास येत नाही. परिणामी या बार्जवर इतर लहान मोठया बोटी अथवा बार्ज जा-ये करताना त्यांची धडक या बुडालेल्या बार्जला बसण्याची शक्यता असून यामुळे अपघात घडून येण्याची दाट शक्यता आहे.

याबाबत रेवदंडा बंदर निरिक्षक सतिश देशमुख यांचेशी संपर्क केला असता, सदर समुद्रात बुडालेले बार्ज काढून घेण्याबाबत संबधीत बार्ज मालकांस सुचना केली आहे. परंतू याबाबत बार्ज मालकांनी कोणत्याही प्रकारचे सहकार्य अदयापी दिले नाहीत. रेवदंडा साळाव पुलाखालून राजरोसपणे कच्चा कोळसा बार्ज वाहतुक होत असते, या बार्ज अनेकदा साळाव-रेवदंडा पुलास धडकत असल्याचे अनेक ग्रामस्थांनी पाहिले आहे. त्यामुळे साळाव-रेवदंडा पुलाची दुरावस्था होत असून सदर पुल बार्जच्या धडकेने कमकुवत होत असल्याने त्याबाबत कारवाइची करण्याची मागणी स्थानेक मागणीकरीत आहेत


![SOUTH INDIAN Bank]

Shop No.02-06, Panacea Hospital Building, Ground Floor, Doctors House, Gurudwara, Sector -08, Plot No. 105,106, New Panvel, Raigad, Maharashtra - 410206

**SOUTH INDIAN Bank GOLD AUCTION NOTICE**

| Sr.No. | LOAN NO. | NAME |
|---|---|---|
| 1 | 1007653000000755 | SREEJA JAYARAJAN |

Gold Auction will be conducted on Friday 28.02.2025, 11:00 a.m at the Bank Premises. Those desirous of participating in the auction should remit Rs.1000/- before 11:00 am on 28.02.2025. Please contact Branch Manager.

Date : 18/02/2025 — sd/- Branch Manager


# ई-रिक्षावाढीसाठी आता माथेरान हॉटेल व रेस्टॉरंट असोसिएशनही आग्रही

**माथेरान : बातमीदार**



माथेरान पर्यटनस्थळी सुरू झालेल्या पर्यावरण पूरक ई-रिक्षांमुळे पर्यटनात लक्षणीय वाढ झालेली दिसत असून येथील वाहतूक व्यवस्था देखील चांगल्या प्रकारेसुधारली आहे.स्थानिक पर्यटन उद्योगावर सुद्धा याचा सकारात्मक परिणाम झाला आहे.त्यामुळे तर आता ई-रिक्षा वाढीसाठी माथेरान हॉटेल असोसिएशन देखीलआग्रही झाली असून त्यांनी सनियंत्रण समितीकडे पत्र व्यवहार केला आहे.

माथेरान पर्यटनस्थळी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार संनियंत्रण समितीच्या देखरेखेखाली ई-रिक्षा प्रकल्प एक वर्षाच्या प्रायोगिक तत्त्वावर पूर्ण करण्यात आला.एकूण वीस ई-रिक्षांना परवानगी या ठिकाणी देण्यात आली. तिन्ही ऋतूंमध्ये ई-रिक्षा अगदी व्यवस्थित आणि पूर्ण क्षमतेने धावत होत्या.ई-रिक्षा विशेषतः जेष्ठ नागरिक,शालेय विद्यार्थी,दिव्यांग बांधव आणि महिलांसाठी फायदेशीर असल्याचे सिद्ध झाले.

माथेरान पर्यटनस्थळी सद्य स्थितीत फक्त वीस ई-रिक्षाच सुरू असून त्यापैकी पंधरा ई-रिक्षा या शालेय विद्यार्थ्यांसाठी दररोज चालविल्या जात आहेत.फक्त पाच ई-रिक्षा नागरिकांना आणि येणाऱ्या पर्यटकांना सेवा पुरवीत आहेत.दिवसभरात केवळ पाच ई-रिक्षा उपलब्ध असल्याने पर्यटक आणि नागरिकांना येथे दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागते.प्रवाशांना तासन्तास रांगेत ताटकळत उभे राहावे लागत आहे.त्यामुळे ई-रिक्षांची सध्याची अपुरी संख्या वाढविणे हे अत्यंत गरजेचे असून ई-रिक्षा सेवा चोवीस तास सुरू ठेवावी असे माथेरान हॉटेल असोसिएशन कडून सनियंत्रण समितीला देण्यात आलेल्या पत्रात नमूद केले आहे.

ई-रिक्षाचे माथेरान पर्यटनस्थळी महत्वपूर्ण योगदान आणि येथील पर्यटनावर सकारात्मक परिणाम होत असल्याने सर्व स्थरातून ई-रिक्षासंख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ७८/२०२४-२०२५ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती..... पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रात कोसळलेल्या नाल्याच्या भिंतीची पुनर्बांधणी करणे. | ₹ ४०,१६,५०६.०० |
| २. | विळे भागड (विकास केंद्र) औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...... जलशुद्धीकरण केंद्रास पावसाळी छपर घालणे व दुरुस्तीची कामे करणे. (सन २०२४-२५) | ₹ ४०,२५,८६९.०० |
| ३. | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती..... पोलादपूर येथील सावित्री धरणावरील १२ मीटर X ६.५ मीटर आकाराच्या रेडियल गेट व रेडियल गेट असेंब्लीमध्ये व इतर संबंधित भागांसाठी गंजरोधक प्रक्रीया करणे. | ₹ ४०,०२,६५२.०० |
| ४. | अडाळी औद्योगिक क्षेत्र...अडाळी औद्योगिक क्षेत्रातील जॅकवेल येथे पॅनेल रूमचे बांधकाम करणे. | ₹ ३९,९६,९१५.०० |
| ५. | विळे-भागड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती..... विळे-भागड औद्योगिक क्षेत्रातील डीएमएस बनावटीच्या फ्लो ट्रान्समीटरची देखभाल व दुरुस्ती करणे व डिजिटल वायरलेस फ्लो मॉनिटरिंग सिस्टमसह त्याचे अपग्रेडेशन करणे. | ₹ ३९,४९,००७.०० |
| ६. | अलिबाग विभाग व नागोठणे औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती........ पोयनाड, जलपाडा, आंबेपूर, अलिबाग, नागोठणे आणि एचएसआर- वेलशेत येथील पथदिवे व हायमास्टची दोन कॅलेंडर वर्षांच्या कालावधीसाठी सर्वसमावेषक वार्षिक तत्वावर देखभाल दुरूस्ती करणे. | ₹ २८,४५,५९८.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक १८/०२/२०२५ ते दिनांक ०४/०३/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक २४/०२/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २५/०२/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे - मोहो, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**

| भुमापन नं./ हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ११६/२/क | ०-०९-०० | २.१० | **तुकाराम रामभाऊ म्हात्रे** |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. १५/०२/२०२५

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
मो. क्र. : ९९३०३६९८६१

Rayat Shikshan Sanstha's

## LOKNETE RAMSHETH THAKUR ENGLISH MEDIUM SCHOOL & JR.COLLEGE, KAMOTHE



Sector-6A, Plot No. 40, Kamothe, Tal-Panvel, Navi Mumbai-410 209 | Mo. 9867031232
Email Id:- kamotheemsrr@gmail.com

### Walk In Interview 2025-2026

**Walk In Interview: Date - 02.03.2025, Time - 8:30 am to 4:00 pm**
**Venue: Loknete Ramsheth Thakur English Medium School & Jr.College, Kamothe**

| Sr. No. | Name of the post | Qualification | No. of the post |
|---|---|---|---|
| 1 | **Supervisor** | Graduate/Post Graduate with B.Ed./M.Ed. from a recognised University. 5 years experience in School of which 2 years in Supervisor position | 3 |
| 2 | **Pre-Primary (Nursery to Sr. KG)** | H.S.C/B.A/B.Sc./B.Com. and Montessori/E.C.C.Ed./P.T.C. (From a recognised institute) | 5 |
| 3 | **Primary Teachers** (STD-1 to 5) English, Hindi, Marathi, Maths, E.V.S., P.E., Art, Music, Computer | HSC/Graduate with/D.Ed./B.Ed. From a recognised University. B.A. B.P.Ed./B.Sc. B.P.Ed./B.Com. B.P.Ed. ATD/G.D. Art/BFA/AM B.A./M.A., Sangeet Visharad B.Sc. (IT/CS)/M.Sc. (IT/CS)/BCA/MCA (with B.Ed. Preferred) From a recognised University. | 30 |
| 4 | **Secondary Teachers** (STD-6th to 10) English, Hindi, Marathi, Maths, Science, SST, P.E., Art, Music, Computer. | Graduate/Post Graduate in the concerned subject with B.Ed./M.Ed. from a recognised University. B.Sc. (IT/CS)/M.Sc. (IT/CS)/BCA/MCA (B.Ed. preferred) | 30 |
| 5 | **Higher Secondary Teachers** (STD-11 & 12) Economics, O.C., B. K., Biology, Chemistry & Physics, IT, English, Hindi, Marathi, Maths | Post Graduate in the concerned subject with B.Ed./M.Ed. from a recognised University. B.Sc. (IT/CS)/M.Sc. (IT/CS)/BCA/ MCA | 11 |
| | | **Total** | **79** |

**Roster will be applicable for all Post**

| Category | SC | ST | VJ-A | NT-B | NT-C | NT-D | SBC | OBC | EWS | SEBC | Open | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| No. of Post | 11 | 5 | 4 | 3 | 2 | 0 | 2 | 16 | 7 | 8 | 21 | **79** |

**Instructions:**
1) Only candidates with excellent subject knowledge and a professional degree are required to appear for the interview.
2) The application form will be available on the day of interview upon payment of a non-refundable fee of Rs. 100/-.
3) Bring your original documents for verification and 2 passport size photos.
4) Kindly email your CV to **kamotheemsrr@gmail.com** from the date of this advertisement until **01/03/2025.**
5) Submit your duly filled application form, along with your CV, self attested copies of your documents, and a cover letter, at the office during the interview.
6) Candidates with prior work experience in school will be given preference.
7) The decision of the selection committee will be final.

SECRETARY
**RAYAT SHIKSHAN SANSTHA, SATARA**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे - नेरेपाडा, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| भुमापन नं./ हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| १२९ | ०-७६-३० पो.ख. ०-०५-१० **एकूण ०-८१-४०** | ८.७२ | **श्रीमती गंगा हिरा पाटील, श्री. प्रभाकर गणु रोडपालकर, श्री. बाळाराम गणु रोडपालकर, सौ. सुरेखा अनंता म्हात्रे, सौ. वनिता निवृत्ती पाटील, सौ. ललिता लहू तातरे** |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. १५/०२/२०२५.

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
मो. क्र. : ९९३०३६९८६१

# छत्रपती शिक्षण मंडळाच्या शिक्षकांचे रौप्य महोत्सवी अधिवेशन



**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**

शैक्षणिक क्षेत्रात विविधांगी उपक्रम राबवून ज्ञानवृद्धीसाठी सतत प्रयत्नशील असणाऱ्या 'छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण' संचालित व वनवासी कल्याण आश्रमशाळा माणगावच्या रायगड विभागातील सहा शाळांचे एकत्रीकरण माध्यमिक विद्यामंदिर रातवड माणगाव येथे रविवार दिनांक १६ फेब्रुवारी रोजी अत्यंत उत्साहात संपन्न झाले.

ज्ञानरचनावादी दृष्टिकोन ठेवून अध्ययन , अध्यापनात नवनवीन प्रयोग करणाऱ्या सर्व उपक्रमशील शिक्षकांचा प्रतिवर्षीप्रमाणे एकत्रीकरणाचा रौप्य महोत्सवी मेळावा संपन्न झाला. छत्रपती शिक्षण मंडळाच्या रायगड जिल्ह्यातील माध्यमिक विद्यामंदिर रातवड, अभिनव ज्ञानमंदिर उसर खुर्द, सरस्वती विद्यामंदिर वडघर मुद्रे, जय जवान जय किसान विद्यालय वाघेरी, गोळेगणी पंचक्रोशी संचालित विद्यालय गोळेगणी, वनवासी कल्याण आश्रमशाळा माणगाव या सहा शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी या एकत्रिकरणात सहभागी झाले होते.

कार्याध्यक्ष श्रीकांत तरटे, कोषाध्यक्ष विश्वास सोनवणे, सरचिटणीस डॉ.निलेश रेवगडे,पर्यावरण तज्ञ अभिजित देशपांडे, रातवड शाळा शालेय समिती अध्यक्ष संजय पालकर, ललित सारंग, सामाजिक कार्यकर्ते कृष्णा महाडीक मुरुड नगरपरिषद प्रशासन अधिकारी दिपाली दिवेकर, सर्व शाळांचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होत

या एकत्रीकरणात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाविषयी तज्ञ मार्गदर्शक उर्मिला जाधव , सदानंद जाधव यांनी मार्गदर्शन केले. नवीन शैक्षणिक धोरणाची व्याप्ती, शिक्षकांनी करावयाची तयारी या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. पर्यावरण संरक्षण याविषयी पर्यावरण तज्ञ अभिजित देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. उपस्थित सर्व मान्यवर, पदाधिकारी व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना रौप्य महोत्सवी वर्षानिमीत्त सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

# नगर भूमापन अभिलेख अद्ययावतीकरण

**चौक : प्रतिनिधी**

भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या भूमी संसाधन विभागा मार्फत सर्व मिळकतींचे सर्व्हे ऑफ इंडिया आणि नागरी स्वराज्य संस्था यांच्या सहाय्याने भूसंदर्भीकरण व नगर भूमापन अभिलेख अद्यावतीकरण करण्याचा देशात १८ फेब्रुवारी रोजी शुभारंभ होत असून यात खोपोली नगर परिषदेची निवड करण्यात आली आहे.

मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते सकाळी ११ वाजता शुभारंभ होणार आहे. आमदार महेंद्र थोरवे,जिल्हाधिकारी किशन जावळे, उप संचालक भूमी अभिलेख अनिल माने, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख सुनील इंदलकर यांच्या उपस्थितीत होणार असून उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ, तहसीलदार अभय चव्हाण यांचीही उपस्थिती असणार आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही जमिन मालक **कै. विक्रम दामा कातकरी चे वारस हरिश्चंद्र रामजी कातकरी, पुष्पा अविनाश पवार, राधाबाई तुकाराम कातकरी, सविता रुपेश कातकरी, रमेश तुकाराम कातकरी, हिराचंद्र तुकाराम कातकरी, हिरा रघुनाथ कातकरी, शेवा लाव्या वाघमारे, सुरेश गणपत वाघमारे, बारकी दत्ता वाघमारे, शांताराम जाण्या कातकरी, ज्ञानेश्वर जाण्या कातकरी, मुक्या जाण्या कातकरी, मनी मना कातकरी, आयती धाऊ वाघे, यमुना गणपत पवार, विष्णू नारायण पवार, रमेश नारायण पवार, विश्वनाथ नवशा वाघमारे, सुरेखा रघुनाथ वाघमारे, शानी जाण्या वाघमारे, गंगू पांडूरंग वाघमारे** यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे - साई, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| भुमापन नं./ हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ३०५/२ | ०-९५-५० पो.ख. ०-१८-८० एकूण १-१४-३० **पैकी ०-६५-००** | ८.३१ |
| ३०५/४ | ०-०३-०० | ०.१६ |
| | **एकूण ०-६८-००** | |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. १५/०२/२०२५.

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
मो. क्र. : ९९३०३६९८६१

## कुळगांव बदलापूर नगर परिषद

नवीन प्रशासकीय इमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे.
ईमेल : coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in वेबसाईट : http://kbmc.gov.in

संदर्भ : कुबनप/ई-गव्ह/१३८/२०२४-२५ दिनांक :- १५/०२/२०२५

**जाहीर ई-निविदा सुचना क्र. ३/२०२४-२५**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत सेवा ऑनलाईन पध्दतीने देणेकरिता संगणक प्रणाली विकसीत करणे व कार्यान्वीत करुन देणे या कामाकरिता महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि.१८/०२/२०२५ ते दि. २५/०२/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत असून तसेच सदरची निवदा दि.२७/०२/२०२५ रोजी दुपारी तीन वाजल्यानंतर उघडण्यात येतील.

**सही/-**
**(मारुती गायकवाड)**
मुख्याधिकारी,
कुळगांव बदलापूर नगरपरिषद

## ग्रामपंचायत खरसई

मु. खरसई, ता. म्हसळा, जि. रायगड

**कामाची निविदा**

| अ.क्र. | कामाचे नाव | वर्ष | रक्कम | अनुदान प्रकार | १% इसारा | निविदा फी | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | देवळाची विहिर दुरुस्ती करणे. | २०२४-२५ | २३८९५०/- | टाईड | २३८९/- | १००/- | ३ महिने |
| २ | हनुमान मंदिर विहिर दुरुस्ती करणे. | २०२४-२५ | २३८९५०/- | टाईड | २३८९/- | १००/- | ३ महिने |
| ३ | मधली आळी ते कोळीवाडा गटार | २०२३-२४ | ४७७९००/- | टाईड | ४७७९/- | १००/- | ३ महिने |
| ४ | कोळीवाडा अंगणवाडी दुरुस्ती करणे. | २०२४-२५ | ५७३४८/- | अन टाईड | ५७४/- | १००/- | ३ महिने |
| ५ | नारायण पयेर ते पांडुरंग कांबळे गटार | २०२४-२५ | २९८२०९/- | अन टाईड | २९८२/- | १००/- | ३ महिने |

**अटी शर्ती :-**
१. सिलबंद निविदा दिनांक १८/०२/२०२५ ते दि. २२/०२/२०२५ या कालावधी पर्यंत सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत सादर करावी.
२. प्राप्त निविदा मासिक सभेत उघडण्यात येतील.
३. निविदा सादर करताना ठेकेदाराने प्रत्येक कामाची १% इसारा रक्कम भरणा केल्याशिवाय निविदा स्विकारल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.
४. मुदतीत न आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.
५. कोणतीही एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा पुन्हा निविदा मागविण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला राहील.
६. काम पूर्ण झाल्यावर एक वर्ष विनामुल्य देखभाल करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

दिनांक : १७/०२/२०२५

**सही/-**
**(एम. एस. जाधव)**
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत खरसई

**सही/-**
**(कोमल कमलाकर वेटकोळी)**
सरपंच
ग्रामपंचायत खरसई

# डीपीएस फ्लेमिंगो तलाव क्षेत्र संवर्धनासाठी राखीव करणार -वनमंत्री गणेश नाईक

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील नेरुळ येथील डीपीएस फ्लेमिंगो तलाव वाचवण्यासाठी पर्यावरणवाद्यांच्या मोहिमेला चालना देण्यासाठी, महाराष्ट्राचे वनमंत्री गणेश नाईक यांनी ३० एकरच्या पाणथळ जागेला संवर्धन राखीव म्हणून घोषित करण्यासाठी सरकारी समितीच्या शिफारशीचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले आहे.



डीपीएस तलावाजवळील फ्लेमिंगोच्या मृत्यूच्या मालिकेच्या पार्श्वभूमीवर आणि स्थलांतरित पक्ष्यांच्या अधिवासाचे जतन करण्याचे मार्ग सुचवण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीने सरकारला पाणथळ जागेला संवर्धन राखीव म्हणून घोषित करण्याची शिफारस करण्याचा निर्णय घेतला आहे.

पर्यावरण निरीक्षक नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी.एन. कुमार यांनी शुक्रवारी नाईक यांची भेट घेऊन त्यांना हा मुद्दा उचलून नेरुळ पाणथळ जागेचे जतन करण्यासाठी प्रभावित केले आणि नॅटकनेक्टने आरटीआय कायद्याच्या माध्यमातून मिळवलेल्या सरकारी समितीच्या अहवालाची प्रत लिखित स्वरूपात त्यांना अनेक सूचना सादर केल्या.

नाईक यांनी ताबडतोब वन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांना पत्र पाठवले. मी याचा पाठपुरावा करेन, असे नाईक यांनी नॅटकनेक्टला सांगितले. समितीने सिडकोला चोक पॉइंट्स साफ करण्यास आणि तलावात जाणारा पाण्याचा प्रवाह सोडण्यास सांगितले. राज्य खारफुटी कक्षानेही अलीकडेच सिडकोला सरकारी समितीच्या अहवालाची आठवण करून दिली आहे. तरीही शहर नियोजनकाराने कारवाई केलेली नाही आणि जलस्रोत घाणेरडा राहिला आहे आणि त्यामुळे भरपूर चिखल आणि शेवाळ साचले आहे, असे नवी मुंबई पर्यावरण संवर्धन सोसायटी (एनएमईपीएस) कार्यकर्ते संदीप सरीन म्हणाले.

नॅटकनेक्टने नाईक यांना असेही निदर्शनास आणून दिले की नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेड (एनएमआयएएल) ने केंद्राला दिलेल्या अहवालात प्रकल्प क्षेत्राभोवती असलेल्या जैवविविधतेचे संरक्षण केले जाईल असे वचन दिले आहे.

केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाला (एमओईएफसीसी) सादर केलेल्या अनिवार्य अहवालात असेही म्हटले आहे की सिडको आणि एनएमआयएएल बीएनएचएसने सुचविल्याप्रमाणे पाणथळ जागा जतन करण्यासाठी पावले उचलतील. यामुळे पर्यावरणाच्या हितासाठी कृती करण्याची सिडकोवर अतिरिक्त जबाबदारी येते परंतु शहर नियोजनकार नकार देत आहेत, असे नॅटकनेक्ट म्हणाले.



**नवी मुंबई : मोरणा वारणा सहकारी पतसंस्था मर्यादित यांच्या वतीने शिराळा वाळवा विधानसभा आमदार सत्यजित शिवाजीराव देशमुख यांचे अभिनंदन व सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या वेळी आमदार प्रवीण दरेकर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह सर्व संचालक व सदस्य उपस्थित होते.**

## वीर वाजेकर महाविद्यालयात पुण्यतिथी व पारितोषिक समारंभ

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेचे उरण तालुक्यातील फुंडे येथील वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात वीर वाजेकर पुण्यतिथी व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ झाला.



मुलाखती दरम्यान विद्यार्थ्यांने कशी मुलाखत द्यावी, याविषयी त्यांना ज्ञान नसल्याने आपली मुले निवडली जात नसल्याचे प्रमुख पाहुणे सिंगापूर पोर्टचे असिस्टंट व्हाईस प्रेसिडेंट मनोज गावंड यांनी म्हटले आहे. या महाविद्यालयात मुलाखत तंत्र व मंत्र याविषयावर कार्यशाळेचे आयोजन करावे असेही मत व्यक्त केले.

प्रभारी प्राचार्य डॉ.आमोद ठक्कर यांनी महाविद्यालयाच्या वाटचालीचा आढावा घेतला. तसेच मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ट एनएसएस व एनसीसी कॅडेट व महाविद्यालयातील प्राध्यापकांचा त्यांचे संशोधन यशाबद्दल याशिवाय उत्कृष्ट सेवक म्हणून दोन शिक्षकेतर सेवकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष कृष्णा कडू यांनी तू.ह.वाजेकर यांचे उरण तालुक्यासाठी असणारे योगदान व त्यांची शिक्षणाबद्दची तळमळ व्यक्त केली.

या कार्यक्रमासाठी ॲड भार्गव पाटील, रमाकांत म्हात्रे, सुरेश म्हात्रे आदी उपस्थित होते.



**पनवेल : श्री विघ्नहर्ता महिला मंडळ टेंभोडे यांच्या वतीने श्री सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आली होती. यानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत पूजेचे दर्शन घेतले. या वेळी आयोजकांनी त्यांचे स्वागत केले.**

## आजपासून नेरूळमध्ये वैचारिक शिवजयंती महोत्सव

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

दुर्गमित्र परिवार, नवी मुंबई आणि शिव -शंभो जन्मोत्सव समिती, नेरुळ यांच्या संयुक्त विद्यमाने १८ आणि १९ फेब्रुवारी रोजी नेरूळ, सेक्टर ८ येथील साईबाबा होटेल चौकात वैचारिक शिवजयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याचे स्वप्नील घोलप यांनी कळविले आहे.

प्रारभी, १८ फेब्रूवारी रोजी सायंकाळी ४ वाजता महिला रांगोळी स्पर्धा, ऐतिहासिक घटनावर आधारित चित्रकला स्पर्धा तर सायंकाळी ६ वाजता शाहिरी पोवाडे व देवीचा गोंधळ आहे.

शिवजयंती दिनी सकाळी ७ वाजता शिवज्योत आगमन होणार आहे. या दिवशी सकाळी ९ ते रात्रौ ११ दरम्यान शिवकालीन शस्त्र प्रदर्शन शिवप्रेमीसाठी ठेवण्यात आले आहे. सायंकाळी ६ वाजता शिवराय भाग्य देशाचे या विषयावर व्याख्यान आहे तर सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम व बक्षीस वितरण समारंभ सायंकाळी ७: ३० वाजता महिला सक्षमीकरण यावर मार्गदर्शन तर रात्री महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून शिवप्रेमी आणि नागरिकांनी दोन दिवशीय वैचारिक शिवजयंती महोत्सवात सहभागी व्हावे, असे दुर्गमित्र परिवार अध्यक्ष स्वप्नील घोलप यांनी कळविले आहे.

## गव्हाण विद्यालयात आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडकेंना अभिवादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशभक्तीने प्रेरित होऊन सशस्त्र क्रांतीचा लढा उभारणारे आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या पुण्यतिथीनिमित्त येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. ज्यनिअर कॉलेजमध्ये त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

इयत्ता सातवी ब च्या वर्गांच्या वतीने झालेल्या या कार्यक्रमात विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांच्या हस्ते आद्य क्रांतिवीरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, एकनाथ ठाकूर, सागर रंधवे, चित्रलेखा पाटील, सुरेश पारखे आदी शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

लक्ष अजय गायकवाड व अर्जुन वैभव घरत या विद्यार्थ्यांनी क्रांतिवीरांच्या जीवनावर आधारित अनुक्रमे मराठी व इंग्रजी भाषांमधून भाषणे केली.

या वेळी त्यांचे वर्ग शिक्षक देवेंद्र म्हात्रे यांनी भाषण करणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख रकमेची पारितोषिक देवून त्यांना प्रोत्साहित केले. या वेळी सर्व शिक्षक व इयत्ता सातवी ब या वर्गातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## माजी नगरसेवक भरत जाधव यांचा आत्महत्येचा प्रयत्न

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील जिल्ह्यातील भाजपचे माजी नगरसेवक भरत जाधव यांनी विष पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना समोर आली आहे.



प्राथमिक माहितीनुसार, रायगड जिल्ह्यातील कर्जत पोलीस ठाण्यात हा प्रकार घडला. भरत जाधव यांनी विष पिण्याच्या आधी आपली फसवणूक झाल्याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे, मात्र नेमक्या कोणत्या प्रकरणामुळे नगरसेवक भरत जाधव यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले, हे अद्याप समजू शकलेले नाही. विष प्यायल्यानंतर भरत जाधव यांना त्रास जाणवू लागला. त्यामुळे त्यांना तातडीने नवी मुंबईच्या अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.

व्हिडिओद्वारे भरत जाधव यांनी आत्महत्या का करत आहोत याचे स्पष्टीकरण दिले आहे. मी आज प्रचंड मानसिक तणावात हे पाऊल उचलत असल्याचे ते व्हिडिओत म्हणाले.

## शैला खाडे यांना उर्जिता पुरस्कार प्रदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सीकेटी कॉलेज, खांदा कॉलनी येथे ज्या महिला स्वतःच घर, व्यवसाय, छंद जोपासून सामाजिक काम करत असतात, त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना भारत विकास परिषद, उर्जिता पुरस्काराने सन्मानित करत असते. याच शृंखलेचा भाग म्हणून या वर्षी देणात येणारा उर्जिता पुरस्कार हा शैला दीपक खाडे यांना देण्यात आला.



मासिक पाळीसारख्या संवेदनशील विषयावर महिला, मुलींमध्ये जनजागृतीचे काम शैला खाडे करत आहेत. मासिक पाळी विषयी असलेल्या अंधश्रद्धा आणि गैरसमज दूर करून प्लास्टिक - केमिकलयुक्त सॅनिटरी पॅड वापरल्यामुळे होणारे दुष्परिणाम याविषयी गेल्या नऊ वर्षात संपूर्ण महाराष्ट्रात २००० पेक्षा जास्त जनजागृतीचे कार्यक्रम घेतले आहेत. त्यामुळे लाखो महिलांचा पाळी विषयी असणारा दृष्टिकोन बदलला आहे. त्याचबरोबर बचत गटांच्या माध्यमातून उत्पादित वस्तुंना बाजारपेठ उपलब्ध करून देणे.

महिलांना ब्युटीशीयन, शिवणकाम, पाककला असे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी बनायला मदत केली आहे.

या केलेल्या कामाची दखल घेऊन भारत विकास परिषद पनवेल शाखेतर्फे देण्यात येणारा उर्जिता हा यावर्षीचा मानाचा पुरस्कार शैला दीपक खाडे यांना देण्यात आला.

वर्षा प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमाला, संस्थेच्या अध्यक्ष डॉ कीर्ती समुद्र, सचिव डॉ पद्मजा कुलकर्णी, शीतल विचार, आभा आंबेकर, ज्योती कानिटकर, सुनीता खरे, गडकरी, शर्मा, समीरा गांधी, डॉ पुणतांबेकर तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि इतर मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात प्रश्नमंजुषा स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात सोमवारी (दि.१७) अकाउंट व फायनान्स विभागातर्फे फायनान्स विषयावरती प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन केले होते.



या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील अकाउंट ऑफ फायनान्स भागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन विचारलेल्या वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे आत्मविश्वासाने दिली याचाच फायदा विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या बँकेच्या स्पर्धा परीक्षा देताना होणार आहे. या स्पर्धेमध्ये सुमारे ५० विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त असा सहभाग घेतला. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक एस वाय बी कॉमच्या विद्यार्थ्यांनी व द्वितीय क्रमांक अकाउंट व फायनान्स विभागाच्या विद्यार्थ्यांनी पटकाविला.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या स्पर्धे साठी महाविद्यालयातील अकाउंट व फायनान्स विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना प्रोत्साहन दिले व सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले.

या स्पर्धेचे आयोजन प्रा. नंदिनी सकपाळ यांनी केली तसेच प्रा. योगिता पाटील, प्रा. आनंद शेलार, प्रा. प्रवर शर्मा अकाउंट व फायनान्स विभाग प्रमुख व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

क्लिक...क्लिक...!



**विटा (सांगली) : पोटासाठी भटकंती करत आणि गावाच्या रस्त्यालगत तापत्या भट्टीवर घणाचे घाव घालत लोखंडाला विविध आकार देणारी घिसाडी जमात. याबद्दल लोणंद गावचे श्री. पवार सांगतात ही आमची तिसरी पिढी भट्टीवर लोखंड तापवून विळा, कुऱ्हाड, खुरपे अशा विविध वस्तू तयार करण्याचे काम करीत आहे.** (छाया : शशिकांत बारसिंग)

## संविधानामुळे चांगली संस्कार मूल्ये रूजली -प्रज्ञा जाधव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संविधानामुळे सामान्य नागरिकाला मतदानाचा अधिकार प्राप्त झाला. त्याची प्रतिष्ठा वाढली. त्याच्यात चांगली संस्कार मूल्ये रुजण्यास मदत झाली, असे भावपूर्ण उद्गार प्रसिद्ध व्याख्यात्या प्रा.प्रज्ञा जाधव यांनी काढले.

शासकीय अध्यापक महाविद्यालय व के.गो.लिमये सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय राज्यघटनेच्या अमृत महोत्सव वर्षपूर्तीनिमित्त शनिवारी (दि.१५) रोजी आयोजित केलेल्या भारतीय राज्यघटना-नागरिकांचे मूलभूत अधिकार व कर्तव्येयाविषयी त्या बोलत होत्या.



त्यापुढे म्हणाल्या, संविधान हा जगातील सर्वात महान व सुंदर ग्रंथ आहे. संविधानामुळे नागरिकास विचार स्वातंत्र्याचे भान निर्माण होऊन प्रश्न विचारण्याचे नैतिक बळ प्राप्त झाले. नवी समाज रचना अस्तित्वात आली. या वेळी त्यांनी समानता व समता यातील फरक स्पष्ट केला. संविधानात नागरिकांचे अधिकार कलम १२ ते३५ मध्ये नमूद केल्याची माहिती त्यांनी दिली. समान नागरीक कायद्याविषयी त्यांनी सुंदर विश्लेषण केले. प्रेक्षक वर्गातील शासकीय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना त्यांनी संविधानाचा प्रचार करण्याचा सल्ला दिला. याशिवाय त्यांनी कायद्याचा गैरवापर टाळण्याचे कळकळीचे आवाहन केले.

वाचनालयाच्या सभागृहात शासकीय महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक वर्ग, वाचनालयाचे सभासद, वाचक व इतर श्रोते उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात वाचनालयाचे कार्याध्यक्ष काशिनाथ जाधव यांच्या प्रास्ताविकाने झाली. समन्वयक प्रा.बिजली दडपे यांनी व्याख्या त्यांचा परिचय ओघवत्या भाषेत करून दिला. अध्यक्षस्थानी वाचनालयाच्या अध्यक्षा श्रीमती सुनिता जोशी होत्या. तर प्रमुख पाहुण्या शासकीय महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा.रमा भोसले होत्या. शोभा भांगे यांच्या आभार प्रदर्शनाने या सुंदर कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वाचनालयाच्या ग्रंथपालनिकिता शिंदे, सहाय्यक ग्रंथपाल संपदा जोशी, लिपिक हर्षिता तुरकर, ग्रंथालय सहाय्यक संजय दिवटे यांनी परिश्रम घेतले.

## निवडक

### दीपक पाटील यांना पुरस्कार



**मोहोपाडा :** चौक वावर्ले येथील दीपक गणपत पाटील युवक अध्यक्ष मराठा समन्वय समिती यांच्या कार्यांचा गौरव म्हणून त्यांना अनंत श्री विभुषित रामानंदाचार्य स्वामी नरेंद्राचार्य महाराजांच्या हस्ते चिपलूण येथे गोरविण्यात आले. या वेळी अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष संदीप सावंत, तालुकाध्यक्ष प्रशांत लाड, विभागीय अध्यक्ष राजेंद्र खैरे आदी मान्यवर उपस्थित होते. दीपक पाटील हे कानसा वारणा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष आहेत. तसेच मराठा समन्वय समितीचे युवक अध्यक्ष असल्याने त्यांचे कार्य राज्यभरात सुरू आहे. त्यांना मराठा भुषण पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### महडमध्ये भाविकांची मंदियाळी



**खोपोली :** रविवारी सुटीच्या दिवशी आलेल्या संकष्टी चतुर्थीनिमित्त महड अष्टविनायक क्षेत्र येथे वरद विनायकाच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. अष्टविनायक क्षेत्र महड येथील अष्टविनायक क्षेत्र वरद विनायकाच्या दर्शनासाठी भाविकांनी केलेल्या गर्दीने मुंबई –पुणे महामार्गावर मोठया प्रमाणात वाहने दिसली. मंदिर व्यवस्थापक राजेंद्र बडगुजर यांनी दिलेल्या माहितीनुसार पहाटेपासून दर्शनासाठी भाविकांची रांग लागली होती. दुपारपर्यंत सात हजारांच्यावर भाविकांनी गणरायाचे दर्शन घेतले होते.



**मुंबई : माणगावमधील उद्योगपती सचिन मेहता यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची सदिच्छा भेट घेत विविध विषयांवर चर्चा केली.**

# रेवदंडा समुद्रकिनारी मोकाट कुत्री

## बंदोबस्ताची मागणी



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा समुद्र किनारी आढळणारी उनाड कुत्रांची मोठी संख्या भितीचे वातावरण निर्माण करणारी आहे. या उनाड कुत्रांचा बदोबस्त संबंधितानी करावा अशी मागणी केली जात आहे.

रेवदंडा समुद्र किनारी कुत्रांची मोठी गँग ठिकठिकाणी उभी असलेली दिसते, सकाळी मार्निग अपच्या निमित्ताने समुद्रावर फेरफटका मारताना ही उनाड कुत्री अंगावर भुंकत येत असतात, त्यामुळे हातात काठी घेवूनच मार्निग अपला जावे लागते. समुद्र किनारी गँग करून उभी असलेली कुत्री मनात भिंती निर्माण करते.

रेवदंडा समुद्र किनारा पर्यटक, पै–पाहूणे तसेच स्थानिक मोठया संख्येने भेट देत आहेत, कुत्रांची वाढती संख्या मात्र येथे भितीचे निर्माण करते, त्यामुळे समुद्र किनारी फिरणे, धावणे, चालणे यासाठी मोकळेपणा प्राप्त होत नाही. समुद्र किनारी फेरफटका मारताना नित्याने ही उनाड कुत्री अंगावर भुकंत धावून जात असल्याचे चित्र दिसते. सुदैवाने अदयापी समुद्र किनारी कोणालाही कुत्रांनी दंश केल्याचे ऐकण्यात येत नाही.

रेवदंडा समुद्रकिनारी कुत्रांची टोळकी ठिकठिकाणी उभी असतात, विशेषतः सकाळच्या सुमारास ही कुत्रांची टोळकी समुद्र किनारी बांगडत असलेली दिसतात. या कुत्रांच्या टोळयाची हद्दी ठरलेली असते, तर एखादा दुसऱ्या टोळीचा कुत्रा अथवा कुत्रांची टोळकी हद्द सोडून आल्यावर कुत्रांचे गँगवार सुरू होते, त्यामुळे येथून जा–ये करणे नेहमी भितीचे ठरते.

# माणगावमध्ये शिवगर्जना कार्यक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

मराठा कर्मचारी मित्रमंडळ, माणगाव रायगडच्या वतीने सालाबाद प्रमाणे बुधवारी (दि.१९) हिंदवी स्वराज्य संस्थापक, रयतेचे राजे, युगप्रवर्तक व चारित्र्यसंपन्न छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अशोकदादा साबळे विद्यालय, माणगाव या ठिकाणी सायंकाळी साजरी होणार आहे. या वर्षी शिवजन्मोत्सवानिमित्त आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिवशाहीर विजय तनपुरे, राहुरी, अहिल्यानगर यांचा संपूर्ण महाराष्ट्राने गौरविलेला अनेक पुरस्कार प्राप्त अस्सल मराठी कार्यक्रम शिवगर्जना आयोजित करण्यात आला आहे.

मराठा कर्मचारी मित्रमंडळ, माणगावमध्ये गेल्या १९ वर्षापासून शिवजयंती साजरी करीत आहेत. आतापर्यंत शिवजयंतीनिमित्त महाराष्ट्रातील अनेक ख्यातनाम शिवव्याख्याते जसे नितीन बानगुडे पाटील, प्रशांत देशमुख, शिवरत्न शेट्टे, निलेश जगताप, शिवशाहीर संतोष साळुंखे, अ‍ॅड.यादव, ह.भ.प.रोहिदास हांडे महाराज हे माणगाव मध्ये येऊन गेलेले आहेत. यावर्षीचे वैशिष्ट्य म्हणजे या कार्यक्रमानिमित्त ना.भरत गोगावले, ना. आदिती तटकरे, खासदार धैर्यशील पाटील यांची उपस्थिती लाभणार आहे.

माणगावकरांनी मोठ्या संख्येने कुटुंबीयांसह उपस्थित राहून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डी.एम.जाधव व प्रमोद देशमुख तसेच सर्व पदाधिकारी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# जिल्हास्तरीय नृत्य स्पर्धेत उसर राजिप शाळा द्वितीय



**रोहे : प्रतिनिधी**

२०२५ रायगड जिल्हास्तरीय क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धा १४ व १५ फेब्रुवारी रोजी खालापूर तालुक्यातील वडगांव येथे घेण्यात आले. पारंपारिक नृत्य स्पर्धेत रोहा तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा उसर या शाळेने जिल्हास्तरीय स्पर्धेत (मोठा गट) द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे.

उसर या शाळेने तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवून रोहा तालुक्याचे प्रतिनिधित्व करताना हे यश संपादन केले आहे. नृत्य दिग्दर्शनाचे उत्तम भूमिका शाळेचे कृतीशील शिक्षक संतोष यादव यांनी केले तर त्यांना सहकार्य करणारे त्यांचे मुख्याध्यापक सुधीर पाटील, विशाखा पोटे, सुरेखा माचुत्रे (शिंदे) यांनी मुलाचे सहकार्य केले.

या यशाबद्दल रोहा गटशिक्षणाधिकारी मेघना धायगुडे, तांबडी केंद्राचे केंद्रप्रमुख विवेकानंद पोटे, सर्व तालुक्यातील शिक्षक वर्ग, पालक, गावातील ग्रामस्थ, विद्यार्थी तसेच परिसरातील ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले.

## शिवजयंतीनिमित्त रक्तदान शिबिर



**माणगाव :** शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबिर सेवाभावी संस्था ता. माणगाव (रजि.) या संस्थेतर्फे सलग ९ व्या वर्षी के. ई.एम रुग्णालय परेल मुंबई यांच्या सौजन्याने शिवजयंतीनिमित्त बुधवारी (दि.१९) रक्तदान शिबिराचे आयोजन सरलादेवी मंगल कार्यालय हॉल याठिकाणी सकाळी ९ ते सायंकाळी ५ यावेळेत करण्यात आले आहे. रक्तदात्यांनी या सामाजिक उपक्रमांत उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन रक्तदान करावे, असे आवाहन शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबिर सेवाभावी संस्थेतर्फे माणगाव नगरीचे माजी नगराध्यक्ष तथा संस्थेचे कार्याध्यक्ष ज्ञानदेव पवार यांनी केले आहे.

# खोपोलीत शिवजयंतीनिमित्त कार्यक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिका व शिवजयंती उत्सव समितीच्या माध्यमातून प्रति वर्षाप्रमाणे याहीवर्षी चार दिवसीय छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव मोठ्या उत्साहात व मोठ्या प्रमाणावर कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे.

शिवजयंती निमित्ताने १८ ते २१ फेब्रुवारीपर्यंत खोपोली शहरात नगरपालिकेच्या माध्यमातून भरगच्च कार्यक्रमांची आखणी करण्यात आली आहे. मंगळवार १८ पासून शिवजयंती सोहळ्याला प्रारंभ होणार आहे. यादिवशी शीळफाटा येथील हनुमान मंदिरात रात्री नऊ वाजता हभप व शिवचरित्रकार राजेश महाराज ननवरे यांचे कीर्तन, अकरा वाजता शिवशाहीर रवींद्र भाऊसाहेब जगदाळे यांचे ऐतिहासिक शिवकाळ या विषयावर मार्गदर्शन, रात्री १२ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याला भव्य पुष्पहार अर्पण करणे. या वेळी मुख्याधिकारी व प्रशासक डॉ. पंकज पाटील, आमदार महेंद्र थोरवे उपस्थित राहणार आहेत.

१९ शिवजयंती दिनी नगरपालिका सभागृहात छत्रपती शिवाजी महाराजांच्या तसबीरीला नमन करून पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे. याच दिवशी सकाळी ११ वाजता शीळफाटा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्यअश्वारूढ पुतळ्यास मानवंदना देण्यात येणार आहे. त्यानंतर संध्याकाळी पाच वाजता शीळफाटा येथील छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळ्यापासून खोपोली शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत सर्व लोकप्रतिनिधी, विविध राजकीय पक्ष, सामाजिक संस्था नागरिक उपस्थित राहणार आहेत.

२० रोजी संध्याकाळी सात वाजता येथील समाज मंदिर रोडवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर शिवशाहीर व शिव व्याख्याते रवींद्र जगदाळे यांचे स्थानिक वारसा आणि आठवणी या विषयावर व्याख्यान होणार आहे. २१ शीळफाटा येथील हनुमान मंदिरात शिवव्याख्याते, नवनीत नंदकुमार यशवंतराव यांचे जैसे शिवराय तैसे शंभुराय या विषयावर व्याख्यानाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

शिवजयंती निमित्ताने तालुक्यातील देवन्हावे व सजगांव ग्रामपंचायतीच्या वतीने ढेकू व देवन्हावे सहित सर्वत्र मोठ्या प्रमाणावर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# मराठी भाषेचे संवर्धन : राज्य मराठी विकास संस्थेची भूमिका

### बृहन्महाराष्ट्रातील मराठी

महाराष्ट्रातील मराठी भाषकांसह महाराष्ट्राबाहेरील मराठी भाषकांचेही विस्मरण होऊ न देण्याची काळजी संस्थेद्वारे घेण्यात येत असते. तसे पाहता मध्ययुगीन कालखंडापासून मराठी भाषा महाराष्ट्राबाहेरही आपले स्थान राखून आहे आणि ती इतर भारतीय भाषांच्या संपर्काने समृद्धही होत आली आहे. मध्ययुगीन मराठीच्या ह्या समृद्धीचा आढावा घेणारा दक्षिण भारतातील मराठी वाङ्मयाचा इतिहास हा प्रकल्प संस्थेने पूर्ण केला असून ह्यात तंजावर आणि आंध्र–कर्नाटक ह्या प्रदेशांतील मध्ययुगीन मराठी साहित्याचा संशोधनात्मक आढावा अभ्यासकांद्वारे घेण्यात आला आहे. उर्दूचा उगम म्हणून मान्यता असणाऱ्या दखनी भाषेशी मराठीचा संबंध दाखवणारे दखनी भाषा : मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार हे पुस्तक तसेच दाक्षिणात्य साहित्य संस्कृतीचा मराठीशी अनुबंध स्पष्ट करणारे पुस्तकही संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात आले आहे.

बृहन्महाराष्ट्र मंडळे : अर्थसहाय्य योजना

महाराष्ट्र राज्याने २०१० साली स्वीकारलेल्या सांस्कृतिक धोरणातील प्रकरण ४ भाषा आणि साहित्य याअंतर्गत महाराष्ट्राबाहेर अन्य राज्यांत मराठी भाषा, साहित्य आणि महाराष्ट्रीय संस्कृती या संदर्भात कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त संस्थांना तसेच महाराष्ट्राबाहेर मराठी ग्रंथ प्रकाशनाचे दर्जेदार कार्य करणाऱ्या संस्थांना अर्थसाहाय्य देण्यात येते.

तसेच महाराष्ट्राची व्यवहारभाषा, प्रशासनिक भाषा आणि ज्ञानभाषा ह्या तिनही स्तरांवर मराठी भाषेचा सर्वांगीण वापर वाढविणे, शासनव्यवहाराच्या प्रशासन, कायदा, न्याय, जनसंपर्क अशा विविध शासकीय व निमशासकीय यंत्रणांमध्ये मराठी भाषेचा लोकाभिमुख आणि सुलभ वापर वाढविण्यासाठी भाषिक उपक्रम हाती घेणे व उपकरणे निर्माण करणे. या उद्दिष्टांना अनुसरून राज्य मराठी विकास संस्थेमार्फत महाराष्ट्रातील मराठी भाषेसंदर्भात संशोधन करणारे संस्था / मंडळ यांना अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्यात येते.

### आंतरराष्ट्रीय मराठी मंचाची स्थापना

राज्य मराठी विकास संस्थेचे काम मुख्यत्वे मराठी भाषेचे जतन, संगोपन आणि भारतासह जगभरात संवर्धन करणे, प्रचार–प्रसार करणे हे आहे. या अंतर्गतच राज्य मराठी विकास संस्थेद्वारे आंतरराष्ट्रीय मराठी मंचाची स्थापना करण्यात आली असून. या आंतरराष्ट्रीय मराठी मंचाचा मुख्य उद्देश म्हणजे माय मराठीचा प्रचार आणि प्रसार करणे, जगभरात तिचा वारसा कसा पुढे नेला जाईल, यासाठीचे प्रयत्न करणे अशी आंतरराष्ट्रीय मराठी मंचाच्या स्थापनेमागील भूमिका आहे. मा. डॉ. ज्ञानेश्वरजी मुळे ह्यांची ह्या मंचाचे समन्वयक म्हणून निवड करण्यात आलेली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध देशभरातील १७ उपसमन्वयकांची निवड केली. या समन्वयकांमार्फत आंतरराष्ट्रीय मंचावर अर्थात देशाच्या बाहेरील अनेक भागात माय मराठीचा प्रचार आणि प्रसार कसा होईल, ही माय मराठी साता समुद्रापार कशी नेता येईल यासाठी प्रयत्न केले जात आहेत तसेच ज्या ज्या देशात मंचाचे सदस्य कार्यरत आहेत त्या त्या ठिकाणी आता मराठी वर्ग सुरू करण्याचा राज्य शासनाचा मानस आहे. तसेच जगभरात आधिकाधिक मराठी माणसांत मराठीचे जतन आणि संवर्धन व्हावे यासाठी अधिक प्रमाणात उप–समन्वयकांची नेमणूक राज्य मराठी विकास संस्थेद्वारे करण्यात येणार आहे.

### विश्व मराठी संमेलन

आजपर्यंत महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा षिभागाद्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या विश्व मराठी संमेलन या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश हाच की माय मराठीचा जगभरात प्रचार आणि प्रसार व्हावा, तिचे जतन आणि संवर्धन या दृष्टीनेही संबंध जगभरात प्रयत्न व्हावेत.

विश्वभरातून मराठी माणून एकाच छताखाली एकत्र आणण्यासाठीचे उत्तम माध्यम म्हणजे विश्व मराठी संमेलन हे होय. ह्या विश्व संमेलनात जे जगभरात मराठी भाषिक उद्योजक कार्य करीत असतात ते एकाच छताखाली येऊन तीन दिवसीय विश्व मराठी संमेलनामध्ये विविध विषयांवर चर्चासत्रे, कला व साहित्य आणि माय मराठीचा वारसा पुढे नेण्यासंदर्भात अनेकविध कार्यक्रम राबवले जातात.

२०२३ च्या जानेवारीत पहिले मराठी विश्व संमेलन पार पडले. या पहिल्या–वहिल्या विश्व मराठी संमेलनाला प्रचंड यश मिळाल्याचे आपल्याला दिसून येते.




ह्या विश्व मराठी संमेलनामध्ये तीनही दिवस अत्यंत सुंदर आणि दिमाखदार असे माय मराठीचे कार्यक्रम झाले. ह्या संमेलनास महाराष्ट्रासह देश–विदेशातून अनेक नामवंत मराठी साहित्यिक, उद्योजक उपस्थित होते.

२७, २८ आणि २९ जानेवारी २०२४ ह्या तीन दिवसांच्या कालावधीत सिडको प्रदर्शन केंद्र, नवी मुंबई येथे दुसरे मराठी विश्व संमेलन आयोजित करण्यात आले. ह्या संमेलनाच्या व्यासपीठावर माय मराठीची जोपासना, तिचा प्रचार, प्रसार आणि भविष्यात आपण ताच्यासाठी काय करावे ह्याविषयी ऊहापोह करण्यात आला. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ आणि भाषा सल्लागार समिती या तीनही मंडळाचे अध्यक्ष, ख्यातकीर्त वैज्ञानिक डॉ. रघुनाथ माशेलकर असे अनेक विद्वान या कार्यक्रमाचे आकर्षण ठरले. मुख्यत्वे मा. राज ठाकरे ह्यांनी ह्या कार्यक्रमास उपस्थित राहून उपस्थित मराठी जनांस संबोधित केले.

मराठीच्या वाचनसंस्कृतीचे संवर्धन

कोणत्याही भाषेच्या समृद्धीचे दर्शन तिच्या साहित्यव्यवहारातून घडत असते आणि आधुनिक काळात ज्ञानव्यवहार हा लिखित मुद्रित माध्यमावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असतो हे लक्षात घेऊन संस्थेद्वारे मराठी भाषेतील वाचनसंस्कृती वाढावी ह्यासाठी नियोजनपूर्वक प्रयत्न करण्यात येत आहेत.

### पुस्तकांचं गाव

हे ऑन वे या वेल्स (इंग्लंड) मधील पुस्तकाच्या गावाच्या धर्तीवर पुस्तकांचं गाव ही संकल्पना अस्तित्वात येऊन पुस्तकांचं गाव या अभिनव उपक्रमाचे उद्घाटन दि.४ मे, २०१७ रोजी करण्यात आले. पुस्तकांचं गाव या योजनेची लोकप्रियता लक्षात घेऊन मराठी भाषेचा विकास, प्रचार, प्रसार व वाचन संस्कृतीची जोपासना व्हावी तसेच भाषेची आवड वाढावी या उद्देशाने पुस्तकांचे गाव ही संकल्पना आकारास आली.

भिलार गावातील घरे, लॉज आणि शाळा, मंदिरे अशी सार्वजनिक ठिकाणे मिळून ३५ जागा निवडण्यात आल्या आहेत. या जागांमध्ये साहित्य प्रकारांनुसार प्रत्येकी सुमारे ८०० ते १२०० पुस्तके, अशी सुमारे ३५,००० पुस्तके ठेवण्यात आली आहेत, प्रकल्पास भेट देणारे वाचक–पर्यटक पुस्तकांचा लाभ घेतात. संबंधित घरमालकांनी त्यांच्या घरांतील सुमारे १५० ते ५०० चौरस फूट जागा वाचन सेवेसाठी विनाशुल्क/ विनामोबदला उपलब्ध करुन दिली आहे. गेल्या ६ वर्षांत सुमारे ५ ते ६ लाख पर्यटकांसह विविध क्षेत्रांतील शेकडो मान्यवरांनी भेट देऊन गौरविले. सध्या एकूण ३५ दालने (घरे व सार्वजनिक ठिकाणे) कार्यरत आहेत.

### पुस्तकांचं गाव–विस्तार योजना

पुस्तकांचं गाव ह्या प्रकल्पाच्या विस्तार योजनेतील मालपेवाडी, पोंभुर्ले, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग येथील पुस्तकांच्या गावाच्या पहिल्या दालनाचे उद्घाटन आणि लोकार्पण सोहळा दि. १० मार्च २०२४ रोजी संपन्न झाला. विस्तार योजनेतील मालपेवाडी येथे प्रातिनिधिक स्वरूपात मालपे ग्रो टूरिझम यांच्या कार्यालयात पुस्तकांचं गाव कार्यरत करण्यात आले असून पुढील काळात गावातील अन्य ठिकाणीही पुस्तकांची दालने सुरू करण्यात येणार आहेत. विविध साहित्य प्रकारांनुसार तसेच सर्वकाळ लोकप्रिय असणारी पुस्तके ह्या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार असून येत्या काळात मराठी साहित्याचे वाचक व अभ्यासक या ग्रंथदालनाचा लाभ घेऊ शकतील.

पहिल्या टप्प्यातील विस्तार योजनेतील मालपेवाडी, पोंभुर्ले येथील पुस्तकांच्या गावाच्या उद्घाटनानंतर पुढील काळात वेरुळ, नवेगाव बांध आणि अंकलखोप येथेही पुस्तकांचं गाव उभारण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे. लवकरच ही गावेही वाचक–पर्यटकांसाठी सुरू होतील.

### कवितांचं गाव

भिलार येथे भारतातील पहिले पुस्तकांचे गाव अस्तित्वात आले. ह्याच धर्तीवर भारतातील पहिले कवितेचे गाव, कविवर्य मंगेश पाडगावकर यांचे जन्मगाव असलेल्या उभादांडा, ता. वेंगुर्ला येथे अस्तित्वात येत असून देशातल्या पहिल्या कवितेच्या गावाचे उद्घाटन आणि लोकार्पण सोहळा १० मार्च २०२४ रोजी संपन्न झाला.

येथे येणाऱ्या सर्वच वाचक–पर्यटकांना मंगेश पाडगांवकरांच्या कवितेबरोबर महाराष्ट्रातील सर्वच नामवंत कवीच्या कवितांचा आस्वाद घेता येणार आहे. त्यातून उद्याचे अनेक कवी जन्माला येतील असा आशावाद आहे. निसर्गरम्य वातावरणात वसलेल्या या गावात आणि आजूबाजूच्या परिसरात पर्यटनासाठी येणारे पर्यटक विविध अस्सल कोकणी मेव्यासोबतच काव्यांचाही आनंद घेतील, वाचनसंस्कृती वाढवतील, माय मराठीचा प्रचार–प्रसार करतील.

### महत्त्वाचे वार्षिक उपक्रम

### मराठी भाषा गौरव दिन

२७ फेब्रुवारी हा दिवस ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज उर्फ वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात येतो. ह्या मराठी भाषा गौरव दिनाच्या औचित्याने मराठी भाषा विभागाद्वारे आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात राज्य शासनाचे विविध पुरस्कार प्रदान करण्यात येतात. ह्या आयोजनात राज्य मराठी विकास संस्थेचा सहभाग असतो.

### मराठी भाषा संवर्धन पुरस्कार

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे मराठी भाषेचा (ललित साहित्य वा वाङ्मयाखेरीज इतर व्यवहारक्षेत्रे या संदर्भातील) शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणारी महाराष्ट्रातील तसेच बृहन्महाराष्ट्रातील व्यक्ती/संस्था यांना अशोक केळकर मराठी–भाषा–अभ्यासक पुरस्कार तसेच मराठी भाषेचे जतन, संवर्धन व वाचन संस्कृती अशा विविध क्षेत्रात अनमोल योगदान देणाऱ्या महाराष्ट्रातील तसेच बृहन्महाराष्ट्रातील व्यक्ती/संस्था यांना मंगेश पाडगांवकर मराठी–भाषा–संवर्धक पुरस्कार असे दोन महत्त्वाचे पुस्कार सन २०१५पासून प्रदान करण्यात येतात. हे पुरस्कार मराठी भाषा गौरव दिनी आयोजित कार्यक्रमात मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते प्रदान करण्यात येतात.

### वाचन प्रेरणा दिन

१५ ऑक्टोबर हा माजी राष्ट्रपती स्व. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. ह्यानिमित्ताने वाचन संस्कृती जोपासण्यासाठी राज्य मराठी विकास संस्थेकडून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

### मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

महाराष्ट्र–शासनाच्या वतीने दि. १४ जानेवारी ते दि. २८ जानेवारी ह्या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे आयोजन करण्यात येत असते. ह्या कालावधीत राज्य मराठी विकास संस्थेतर्फे विविध भाषिक कार्यक्रम प्रत्यक्ष आणि महाजालीय स्वरूपात आयोजित करण्यात येतात.

राज्य मराठी विकास संस्थेच्या या उपक्रमांच्या माध्यमातून त्या त्या वेळी मराठी भाषेच्या प्रचार व प्रसारासाठी, संवर्धनासाठी तसेच वाचन संस्कृती संवर्धित करून तिला अधिक समद्ध करण्यासाठी सातत्याने कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. मराठी भाषेच्या संदर्भातील हे उपक्रम राबवितांना महाराष्ट्रातील विविध साहित्य संस्था, शाळा, महाविद्यालय, विद्यापीठे यांचेदेखील वेळोवेळी मोलाचे सहकार्य राहिले आहे.

### आगामी प्रकल्प

अरबी–तुर्की–मराठी व्युत्पत्तिकोश, भाषावैज्ञानिक दृष्टिकोनातून बोलीअभ्यास संपादित इ–पुस्तक असे विविध प्रकल्प आगामी काळात राज्य मराठी विकास संस्थेद्वारे राबविण्यात येणार आहेत.

अशा रीतीने मराठीच्या विकासासाठी विविधांगी प्रकल्प आणि उपक्रम राज्य मराठी विकास संस्थेद्वारे राबवण्यात येत आहेत. मराठीच्या विकासासाठी आवश्यक ते संशोधन करून अभ्यासकांसाठी सामग्री उपलब्ध करून देण्याचे कार्य आजवर संस्था करत आली आहे. असेच कार्य पुढे चालत राहावे ह्यासाठी मराठी भाषक समाजानेही संस्थेचे काम पाहून आवश्यक तो प्रतिसाद सूचनांच्या, कौतुकाच्या वा टीकेच्या स्वरूपातही दिला तरी संस्थेला आपल्या पुढील वाटचालीसाठी साहायभूत ठरणार आहे.

**–डॉ. शामकांत देवरे, संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई**

# गुजरातचा युपीवर ऐतिहासिक विजय

## लक्ष्याचा पहिल्यांदा केला यशस्वी पाठलाग



**वडोदरा : वृत्तसंस्था**

वडोदरा येथील कोटाम्बी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या डब्ल्यूपीएलच्या तिसऱ्या सामन्या गुजरात जायंट्सने ऐतिहासिका विजय नोंदवला. या सामन्यात यूपी वॉरियर्सने प्रथम फलंदाजी करत १४३ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात गुजरात संघाने १२ चेंडू शिल्लक असताना सहा विकेट्सने सामना जिंकला.

गुजरातच्या विजयात सर्वात मोठे आणि महत्त्वाचे योगदान कर्णधार अॅशले गार्डनरचे होते, जिने फलंदाजीत ५२ धावा केल्या आणि गोलंदाजीतही दोन विकेट्स घेतल्या. यासह गुजरात जायंट्सने लक्ष्याचा पाठलाग करताना पहिल्यांदाच विजयावर शिक्कामोर्तब केले. या सामन्यात गुजरातने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. कर्णधार अॅशले गार्डनरचा हा निर्णयही बरोबर ठरला.

गुजरातच्या घातक गोलंदाजीसमोर, यूपी वॉरियर्सने ७८ धावांपर्यंत पाच विकेट गमावल्या होत्या. यानंतर कर्णधार दीप्ती शर्मा आणि उमा छेत्री यांच्या २४ धावांच्या खेळीमुळे या संघाने कसा तरी १४३ धावांचा टप्पा गाठला. गुजरातकडून गोलंदाजी करताना प्रिया मिश्राने कहर केला आणि तीन बळी घेतले.

यानंतर १४४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरात जायंट्सची सुरुवात खराब झाली, कारण बेथ मुनी आणि दयालन हेमलता यांनी २ धावांच्या आतच आपल्या विकेट गमावल्या. लॉरा वोल्वार्डने कर्णधार अॅशली गार्डनरला चांगली साथ दिली, पण वोल्वार्ड २२ धावा करून बाद झाली. गार्डनरने ५२ धावांची अर्धशतकी खेळी केली. त्यानंतर हरलीन देओल आणि डिआंड्रा डॉटिन यांनी शानदार फलंदाजी केली आणि शेवटपर्यंत नाबाद राहिल्या. दोघांमधील ५८ धावांच्या नाबाद भागीदारीमुळे गुजरातचा विजय निश्चित झाला. हरलीनने ३४ धावा केल्या आणि डॉटिनने १८ चेंडूत ३३ धावांची तुफानी खेळी केली. डॉटिनने तिच्या धमाकेदार खेळीत तीन चौकार आणि दोन षटकार मारले. यासह गुजरातचा या हंगामातील पहिला विजय ठरला.



## थाई बॉक्सिंग आणि तायक्वांदो स्पर्धेत 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांना सुवर्णपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यम विद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांनी थाई बॉक्सिंग आणि तायक्वांदो स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले आहे.

मध्य प्रदेशातील भोपाळ येथे झालेल्या दक्षिण आशियाई थाई बॉक्सिंग चॅम्पियनशीपमध्ये सीकेटी विद्यालयात इयत्ता सातवीत शिकणारा अर्थव विक्रम कांबळे याने सुवर्णपदक पटकावले.

मुंबई येथे झालेल्या ३८व्या एशियन ओपन तायक्वांडो चॅम्पियनशिपमध्ये सीकेटी विद्यालयात इयत्ता सातवीत शिकणारा माही बेडेकर आणि दनायशा म्हामुणकर यांनी सुवर्णपदक जिंकले. या स्पर्धेचे आयोजक अचीवर तायक्वांडो ट्रेनिंग सेंटर होते.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ.एस.टी. गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षक, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## जिल्हास्तरीय गोळाफेक स्पर्धेत उरणच्या खेळाडूंचे यश



**उरण : बातमीदार**

रायगड जिल्हा अॅथलेटिक्स चॅम्पियनशिप ही स्पर्धा एचओसी कॉलेज रसायनी येथे झाली. या जिल्हास्तरीय अॅथलेटिक्स स्पर्धेत ४०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये सेंटमेरी स्कूल जेएनपीटी स्कूल व एकलव्य अॅथलेटिक्स अकॅडमी जेएनपीटीच्या खेळाडूंनी यश प्राप्त केले.

स्पर्धेत गोळाफेकमध्ये १० वर्षाखालील मुलांच्या गटात चैतन्य योगेश पाटील, हंसिका अजय तांडेल यांनी प्रथम; साधना सर्वानंद, हर्षित प्रशांत घरत यांनी द्वितीय क्रमांक पटकविला. रेयान केतन तांडेल याने १०० मीटर धावणे व ६० मीटर धावणच्या शर्यतीत तृतीय, जीत नरेंद्र घरत यांनी लांब उडीत द्वितीय आणि जेसिका अजय तांडेल हिने लांब उडीत द्वितीय क्रमांक पटकविला. या सर्व खेळाडूंची पंढरपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय सब ज्युनिअर अॅथलेटिक्स स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांना सेंटमेरी स्कूल जेएनपीटीचे क्रीडा शिक्षक हरिश्चंद्र बोंडकर, राष्ट्रीय खेळाडू राम चौहान यांचे मार्गदर्शन लाभले.

याबद्दल सेंटमेरी जेएनपीटी स्कूलचे मुख्याध्यापक राजेश अलफॉन्स, सुपरवायझर संदेश गावंड, ज्योती नायडू यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आले.

## खोपोली रोटरी क्लबतर्फे राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धा



**खोपोली : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ खोपोलीतर्फे रविवारी (दि. १६) रामशेठ ठाकूर हॉल शिशुमंदिर येथे राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत एकूण १४८ स्पर्धकांनी सहभाग घेतला.

स्पर्धा ११ व १५ वर्षाखालील तसेच ओपन अशा तीन गटात घेण्यात आली. ओपन गटात १० बक्षिसे काढण्यात आली. यामध्ये सर्व विजेत्यांना रोख रक्कम, ट्रॉफी व मेडल देण्यात आले. प्रथम क्रमांक यश कपाडिया यांनी पटकावला. त्यांना पाच हजार रुपये रोख व ट्रॉफी, द्वितीय क्रमांक गोपाल राठोड (३५०० रुपये व ट्रॉफी), तृतीय क्रमांक सोमय्या श्रेयांस (२५०० रुपये व ट्रॉफी) आणि इतर सात बक्षिसे देण्यात आली

पंधरा वर्षाखालील गटात पाच विजेत्यांना रोख रक्कम, ट्रॉफी व मेडल देण्यात आले. यामध्ये प्रथम क्रमांक अभिलाष यादव (दोन हजार रुपये व ट्रॉफी), द्वितीय प्रद्युम्न मिश्रा (१५०० रुपये व ट्रॉफी), तृतीय आरव गायकवाड (एक हजार रुपये व ट्रॉफी) आणि इतर सात बक्षिसे देण्यात आली.

अकरा वर्षाखालील गटात प्रथम क्रमांक प्रसाद आशुतोष कुमार (दोन हजार रुपये व ट्रॉफी), द्वितीय देवेन अद्वय (१५०० रुपये व ट्रॉफी), तृतीय जुई अहिरे (एक हजार रुपये व ट्रॉफी) आणि इतर सात बक्षिसे देण्यात आली.

विजेत्यांना रोटरी क्लब खोपोलीचे अध्यक्ष मिलिंद बोधनकर, खजिनदार सुभाष अगरवाल, माजी प्रेसिडेंट नलिनी रामस्वामी, नीरज जाधव संजय पाटील, अनिल खालापूरकर, राजेंद्र जगताप यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. या स्पर्धेचे चीफ ऑर्बिटर म्हणून अंकित जोशी, डेप्युटी ऑर्बिटर कपिल कोळंबकर, अथर्व जोशी, आविष्कार मारभळ, सार्थक मिंढे यांनी काम पाहिले.

## आयएसपीएल स्टार रजत मुंढेचे रसायनीत जल्लोषात स्वागत




**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आयएसपीएल या प्रतिष्ठेच्या क्रिकेट टूर्नामेंटमध्ये रसायनीतील चांभार्ली गावात राहणारा रजत मुंढे याने उत्कृष्ट फलंदाजाचा किताब तसेच विभागून २५ लाख रुपयांचे बक्षीस मिळविले.

रजत मुंढे याने मुंबई संघाकडून खेळताना या टूर्नामेंटमध्ये २८४ धावा केल्या. फलंदाजीच्या कौशल्याने त्याने चाहत्यांची मने जिंकली. रजत सोमवारी (दि.१७) गावी चांभार्लीत परतला असता फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली तसेच ढोल ताशाच्या गजरात त्याची मिरवणूक काढण्यात आली. या वेळी ठिकठिकाणी त्याचे औक्षण करण्यात आले.

वासांबे (मोहोपाडा) ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच उमा मुंढे, ग्रामविकास अधिकारी वैभव पाटील व उपस्थित ग्रामपंचायत सदस्यांच्या वतीने रजतचा सत्कार करण्यात आला. दरम्यान, रजतवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## नेरूळ येथील वॉकेथॉनमध्ये १५०० नागरिकांचा सहभाग

**नवी मुंबई : बातमीदार**

रस्ता सुरक्षा आणि वाहतुक नियमांचे नागरिकांनी पालन करावे तसेच पर्यावरणाचे रक्षण करावे याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी नवी मुंबई महापालिकेच्या सहयोगाने अपोलो हॉस्पिटल्स, लेट्स सेलिब्रेट फिटनेस व द लर्नयार्ड यांनी आयोजित केलेली वॉकेथॉन १५०० हून अधिक नागरिकांनी उत्साहाने सहभागी होत यशस्वी केली.

नेरूळ जिमखान्यापासून पाच किमी परिसरात चालत जात सहभागी पर्यावरण व सुरक्षेविषयी जागरूक नागरिकांनी संदेश देणारे फलक उंचावित, घोषणा देत जनजागृती केली.

## चेन्नईविरुद्धच्या सामन्यात हार्दिक पांड्यावर बंदी

**मुंबई** : यंदा आयपीएलच्या हंगामात दोन सर्वात मोठे प्रतिस्पर्धी चेन्नई आणि मुंबई यांच्यातील पहिली लढत २३ मार्च रोजी चेपॉक स्टेडियमवर होईल, पण मुंबई संघाचा कर्णधार हार्दिक पांड्या या सामन्यात खेळणार नाही, कारण त्याच्यावर एका सामन्यासाठी बंदी घालण्यात आली आहे.



गेल्या हंगामात हार्दिकला स्लो ओव्हर रेटसाठी दोषी ठरवण्यात आले होते, पण मुंबई संघ स्पर्धेतून बाहेर पडल्याने पांड्याला शिक्षा भोगता आली नाही. यंदा त्यांचा पहिला सामना चेन्नईविरुद्ध आहे. यामध्ये तो बंदीची शिक्षा पूर्ण करेल.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com